# तृतीय वर्ष कला

## सत्र - VI (CBCS)

# आंतरराष्ट्रीय आणि प्रादेशिक संघटना
# प्रादेशिक संघटना आणि आंतरखंडीय गट

## विषय कोड : 86657

© UNIVERSITY OF MUMBAI


**प्राध्यापक डॉ. डी. टी. शिर्के**
स्थानापन्न कुलगुरू
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राचार्य. डॉ. अजय भामरे**
स्थानापन्न प्र-कुलगुरू
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक प्रकाश महानवर**
संचालक
दूर व मुक्त अध्ययन संस्था
मुंबई विद्यापीठ, मुंबई



**कार्यक्रम समन्वयक** : **प्रा. अनिल आर बनकर**
**सहयोगी प्राध्यापक**
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**अभ्यास समन्वयक** : **डॉ. दत्तात्रय म. तोंडे**
सहायक प्राध्यापक
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबईई

**संपादक** : **डॉ. श्रीकांत देविदास महादने**
सहायक प्राध्यापक
राज्यशास्त्र विभाग
डॉ पतंगराव कदम कला आणि वाणिज्य महाविद्यालय
पेण, रायगड.

**लेखक** : **प्रा. निलेश पाटील**
सहायक प्राध्यापक
राज्यशास्त्र विभाग, गोगटे-जोगळेकर महाविद्यालय,
रत्नागिरी

: **डॉ. श्रीकांत देविदास महादने**
सहायक प्राध्यापक
राज्यशास्त्र विभाग
डॉ पतंगराव कदम कला आणि वाणिज्य महाविद्यालय
पेण, रायगड.



**एप्रिल २०२३, मुद्रण - १**

**प्रकाशक**
**संचालक, दूर आणि मुक्त अध्ययन संस्था.**
मुंबई विद्यापीठ,
विद्यानगरी, मुंबई- ४०० ०९८.

**अक्षर जुळणी आणि मुद्रण**
**मुंबई विद्यापीठ मुद्रणालय**
विद्यानगरी, मुंबई

# अनुक्रमणिका


| अध्याय क्र. | नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | प्रादेशिकवाद आणि जागतिकीकरण | १ |
| २ | सुरक्षाविषयक मुद्दे आणि प्रादेशिक संघटना | १२ |
| ३ | भारत आणि प्रादेशिक संघटना | २३ |
| ४ | आंतरखंडिय गट | २९ |

**तृतीय वर्ष कला**

**सत्र - VI (CBCS)**

**आंतरराष्ट्रीय आणि प्रादेशिक संघटना**

**प्रादेशिक संघटना आणि आंतरखंडीय गट**

**अभ्यासक्रम**

**Module 1: Regionalism and Globalization**

1.1The League of Arab States/ Arab League (AL)

1.2 Mercosur -Mercado Comúndel Sur (Southern Common Market)

1.3 African Union (AU)

**Module 2: Security Concerns and Regional Organizations**

2.1 North Atlantic Treaty Organization (NATO)

2.2 Shanghai Cooperation Organisation (SCO)

**Module 3: India and Regional Organizations**

3.1 Bay of Bengal Initiative for Multi-Sectoral Technical and Economic Co-operation (BIMSTEC)

3.2 Indian Ocean Rim-Association for Regional Cooperation (IOR-ARC)

**Module 4: Transcontinental Forums/ Groups**

4.1 Group of 77 (G-77)

4.2 Group of Eight (G- 8)

4.3 BRICS (**B**razil, **R**ussia, **I**ndia, **C**hina, **S**outh Africa)

**Recommended Reading**

{Authentic and up-to-date information about these organizations is available on their respective websites. A number of articles describing/ evaluating the functioning and the role of these organizations are available on the Internet. Colleges may also subscribe to UNews, a monthly newsletter of the UN Information Centre, 55 Lodi Estate, New Delhi-110003 by writing to the Centre. Price of the Newsletter is Re. 1/- (Rupee one) only.}


1. Baylis, John and Steve, Smith (Ed): *The Globalization of World Politics*, OUP, New Delhi, 3rd ed. 2005.
2. *Basic Facts about the United Nations*, The News and Media Division, UNDepartment of Public Information, New York, 2011.
3. Chaterjee, Anik (Ed): *World Politics*, Pearson, New Delhi, 2012.
4. Diehl, Paul F.: *The Politics of Global Governance: International Organizations in an Interdependent World*, Lynne Rienner Publishers; 4th edition, paperback, Boulder,2010.
5. Fawcett, Louise and Hurrell, Andrew (Ed), *Regionalism in World Politics: RegionalOrganization and International Order,* OUP, Oxford, reprint 2000 (1st ed. 1995).
6. Gamble, Andrew and Payne, Anthony (Ed): *Regionalism and World Order*, St. Martin's Press, New York, 1996.
7. Gupta, Sanju (Ed): *An Introduction to International Relations*, Pearson Delhi, 2012.
8. Heywood, Andrew: *Global Politics*, Palgrave Foundation, Palgrave Macmillan, New York, 2011.
9. Karns, Margaret P. and Mingst, Karen A.: *International Organizations: The Politicsand Process of Global Governance,* 2nd edition, 2009
10. Meisler, Stanley: *United Nations: The First Fifty Years*, Atlantic Monthly Press, New York, 1995.

# १

# प्रादेशिकवाद आणि जागतिकीकरण

**घटक रचना**


१.१ उद्दिष्टे

१.२ प्रस्तावना

१.३ प्रादेशिकवाद

१.४ अरब लीग

१.४.१ अरब लीगची उद्दिष्टे

१.४.२ अरब लीगची रचना

१.४.३ अरब लीगचे यशापयश

१.४.५ अरब लीग आणि भारत

१.५ मर्क्योसुर

१.५.१ मर्क्योसुरची पार्श्वभुमी व रचना

१.५.२ मर्क्योसुरचे यशापयश

१.५.३ भारत आणि मर्क्योसुर संघटना

१.६ आफ्रिकन युनियन

१.६.१ आफ्रिकन युनियनची पार्श्वभुमी व रचना

१.६.२ आफ्रिकन युनियनची उद्दिष्टे (AU)

१.६.३ आफ्रिकन युनियन आणि जागतिकीकरण

१.६.४ भारत आणि आफ्रिका

१.७ समारोप

१.८ सराव प्रश्न

१.९ संदर्भ


## १.१ उद्दिष्टे

- प्रादेशिकवाद आणि जागतिकीकरण यांतील सहसंबंध समजून घेणे
- अरब लीग, मर्क्योसुर आणि आफ्रिकन युनियन या प्रादेशिक संघटनांची रचना व कार्ये समजून घेणे
- अरब लीग, मर्क्योसुर आणि आफ्रिकन युनियन या प्रादेशिक संघटनांचे भारताशी असलेले संबंध तपासणे

## १.२ प्रस्तावना

१९९१ नंतर आंतरराष्ट्रीय राजकारणात जागतिकीकरण ही संकल्पना गतीमान होत असून सध्या विविध प्रादेशिक संघटनांचे कार्यही विस्तारतांना दिसत आहेत. वस्तुतः प्रादेशिकवाद आणि जागतिकीकरण या भिन्न कल्पना आहेत. मात्र तरीही जागतिक राजकारणात या परस्परविरोधी संकल्पना प्रभावीपणे एकत्रित काम करतांना दिसत आहेत. अशावेळी विविध प्रादेशिक संघटनांना जागतिकीकरणाच्या झपाट्यात स्वतःमध्ये अनुकूल बदल करावे लागत आहेत.

## १.३ प्रादेशिकवाद

२१ व्या शतकातील प्रगत तंत्रज्ञान आणि राज्यांचे परस्परांवरील वाढत जाणारे परस्परावलंबन पाहता आंतरराष्ट्रीय राजकारणात जागतिकीकरण आणि प्रादेशिकवाद या परस्परविरोधी संकल्पना एकाच वेळी गतिमान होतांना दिसतात. जागतिकीकरण ही अलिकडच्या काळातील संकल्पना असली तरी त्याची सुरवात दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर झालेली दिसून येते. दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक बाजारपेठेचे सुलभीकरण व्हावे यासाठी आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMF) आणि जागतिक बँक (World Bank) यांसारख्या वित्तीय संस्था स्थापन झाल्या. यातून सीमारहीत जागतिक व्यवस्था (Borderless Global Order) ही संकल्पना प्रचलित होऊ लागली. दिवसेंदिवस आर्थिक, वित्तीय, पर्यावरणीय आणि राजकीय मुद्दे आंतरराष्ट्रीय बनत असल्याने जागतिकीकरण ही संकल्पना खऱ्या अर्थाने व्यापक बनत आहे.

अर्थात जागतिकीकरणाच्या काही मुलभूत समस्या आहेत. जागतिकीकरण राष्ट्रांतर्गत सुरक्षा व राजकीय प्रश्न हाताळण्यात अपयशी ठरतांना दिसते. जागतिककरणामुळे राज्यांचे आर्थिक विकास आणि वित्तीय देवाण-घेवाणीवरील नियंत्रण संपुष्टात येत आहे. या पार्श्वभुमीवर प्रादेशिकवाद हा राज्यांसाठी एक आकर्षक पर्याय ठरत असून क्षेत्रीय व्यापारी सहमतीसारख्या (Regional Trade Agreement) मार्गांतून राज्यांना बाजारपेठ आणि आर्थिक व्यवस्थेवर आपली पकड टिकवून ठेवणे शक्य होत आहे. आफ्रिकन यूनियनसारख्या संघटनांचे प्रादेशिक शांततानिर्मीतील यश पाहता प्रादेशिकवाद हा एक चांगला पर्याय ठरतांना दिसत आहे.

प्रस्तुत प्रकरणात आपण अरब लिग, मर्क्योसुर आणि आफ्रिकन यूनियन या संघटनांची निर्मीती आणि प्रादेशिक योगदान यांची चर्चा करणार आहोत.

## १.४ अरब लिग

लीग ऑफ अरब स्टेट्स (LAS) किंवा अरब लीग (AL) ही मध्य पूर्व आणि आफ्रिकेच्या काही भागांतील अरब राज्यांची प्रादेशिक संघटना आहे. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात अरब राष्ट्रांत पॅन-अरबवाद (Pan- Arabism) ही राजकीय विचारधारा प्रभावी बनली. सर्व अरब राष्ट्रांत राजकीय, सांस्कृतिक आणि सामाजिक-राजकीय ऐक्य घडवून आले पाहिजे या उद्देशाने पुढे आलेल्या पॅन- अरबवादी विचारधारेचे एक मुर्त स्वरुप म्हणून अरब लिग संघटनेकडे पाहिले जाते. १९४४ मध्ये इजिप्त, इराक, सिरिया, जॉर्डन आणि लेबनान या देशांनी अलेक्झांड्रीया प्रोटोकॉलवर स्वाक्षरी करीत समान प्रतिनिधीत्वावर आधारित

प्रादेशिक संघटनेची निर्मिती झाली पाहिजे असा विचार मांडला. यातूनच १९४५ मध्ये लीग ऑफ अरब स्टेट्स (LAS) ची स्थापना झाली.

२२ मार्च १९४५ रोजी इजिप्त, सीरिया, लेबनॉन, इराक, ट्रान्सजॉर्डन (आता जॉर्डन), सौदी अरेबिया आणि येमेन या सहा संस्थापक देशांच्या मदतीने रोजी कैरोमध्ये अरब लिगची स्थापन झाली. नंतरच्या काळात लिबिया, सुदान, ट्युनिशिया, मोरोक्को, कुवेत, अल्जेरिया, बहरीन, ओमान, कतार आणि संयुक्त अरब अमिराती, मॉरिटानिया, सोमालिया, पॅलेस्टाईन, जिबूती आणि कोमोरोस या देशांनीही लीग ऑफ अरब स्टेटसचे सदस्यत्व स्विकारले.

### १.४.१ अरब लीगची उद्दिष्टे-

अरब लीगचे प्रमुख उद्दिष्ट सदस्य राष्ट्रांच्या सहकार्याला प्रोत्साहन देणे, त्यांच्या वैयक्तिक आणि सामूहिक स्वातंत्र्य आणि सार्वभौमत्वाचे रक्षण करणे आणि मध्य पूर्व आणि आफ्रिकेतील अरब देशांचे प्रतिनिधित्व करणे हे आहे. अरब लीगच्या चार्टरमध्ये खालील उद्दिष्टे सविस्तरपणे नमूद केली आहेत:

- अरब देशांतील संबंध मजबूत करणे
- सदस्य- राष्ट्रांच्या स्वातंत्र्याचे रक्षण करणे
- सदस्य- राष्ट्रांतील योजना आणि धोरणांमध्ये समन्वय साधणे
- आर्थिक, सांस्कृतिक, सामाजिक, आरोग्य आणि इतर क्षेत्रांत सहकार्य वाढवणे
- अरब राज्यांच्या हितसंबंधांचा आणि घडामोडींचा आग्रह धरणे
- सुरक्षा आणि शांतता सुनिश्चित करण्यासाठी आणि आर्थिक आणि सामाजिक संबंधांचे नियमन करण्यासाठी आंतरराष्ट्रीय संस्थांना सहकार्य करणे

अरब लीग ही आपल्या सदस्य राष्ट्रांना आर्थिकदृष्ट्या संघटीत करणे तसेच परकीय सहाय्य न मागता सदस्य राष्ट्रांतील संघर्ष सोडवण्याचा प्रयत्न करणे यासाठी काम करणारी एक राजकीय संघटना आहे. त्यात राज्य प्रतिनिधी संसदेचे घटक असतात.

### १.४.२ अरब लीगची रचना-

अरब लीगची परिषद (Council), विशेष मंत्री समित्या (Special Committees), सामान्य-सचिवालय (Secretariat) आणि विशेष एजन्सी (Specialised Agency) ही कार्यकारी अंगे आहेत. संघटनेचे सचिवालय कैरो, इजिप्त येथे स्थित आहे.

अरब लिगच्या परिषदेत सर्व सदस्य राष्ट्रे प्रतिनिधीत्व करतात. प्रत्येक सदस्यास एक मत देण्याचा अधिकार असून परिषदेतील निर्णय हे बहुमतावर आधारित असतात. परिषदेची बैठक वर्षातून दोनदा बोलावली जाते.

सचिवालयात राजकीय, आर्थिक, सामाजिक व वैधानिक असे विभाग आहेत. इतर विशेष एजन्सींमध्ये शैक्षणिक, सांस्कृतिक, वैज्ञानिक यांसारख्या एजन्सींचा समावेश होतो.

सुरुवातीच्या काळात अरब लीगने सदस्य राष्ट्रांच्या आर्थिक, सांस्कृतिक आणि सामाजिक हितसंबंधावर लक्ष केंद्रित केले. सदस्य राष्ट्रांत धोरणात्मक बाबींवर समन्वय साधने व समान प्रश्नांवर प्रतिनिधीत्व करता यावे यासाठी १९६४ मध्ये अरब लीग शैक्षणिक, सांस्कृतिक आणि वैज्ञानिक संघटना (ALECSO) ची स्थापना झाली.

सदस्य राष्ट्रांत आर्थिक ऐक्य (Economic integration) निर्माण करण्याच्या दृष्टीने अरब लीगने संयुक्त अरब आर्थिक कृती सरनामा (Joint Arab Economic Action Charter) ची निर्मिती केली. या सरनाम्यामुळे आर्थिक कृतींना आकार प्राप्त देणे अरब लीगला शक्य झाले. याशिवाय १९६५ मध्ये अरब समान बाजारपेठ (Arab Common Market) करण्यात आले. या समान बाजारपेठेमुळे नैसर्गिक संसाधने आणि कृषी उत्पादने, भांडवल आणि श्रमाचे मुक्त चलन तसेच आर्थिक विकासातील समन्वय साधने शक्य झाले.

### १.४.३ अरब लीगचे यशापयश

अरब लीगच्या स्थापनेस पन्नास वर्षांहून अधिक काळ ओलांडला असून सध्या ही संघटना अरब राष्ट्रांत आपली उपयुक्तता टिकवून ठेवण्याची तसेच स्थानिक संघर्ष सोडविण्यात बाजूला न टाकल्या जाण्यासाठी प्रयत्न करत आहे.

पॅलेस्टाईन- इस्त्राईल संघर्ष, लेबनन- इस्त्राईल संघर्ष आणि इराक संघर्षांमुळे संपूर्ण अरब राष्ट्रांतील ऐक्य धोक्यात आले आहे. दुसरीकडे संघटनेची फुगीर सदस्यसंख्या, संघटनेच्या अनियमीत शिखर बैठका यामुळे अरब लीगची उपयुक्तता काय? असा प्रश्न उपस्थित केला जातो. मात्र, संघटनेची विविध संघर्षजन्य परिस्थितीतील कामगिरी पाहता अरब लीगचे यशापयश पुढीलप्रमाणे मांडता येईल-

- २०१० मधील अरब स्प्रिंग प्रश्नावर अरब लीगने प्रभावी हस्तक्षेप करीत लिबियाचे हुकूमशहा मुअम्मर गद्दाफी यांच्यावर टिका केल्याने आंतरराष्ट्रीय दबाव प्रभावी बनला
- १९६७ च्या इस्त्राईल- अरब सहा दिवसीय युद्धानंतर अरब लीगने इस्त्राईलला पाठिंबा देणाऱ्या अमेरिका, युनायटेड किंगडम आणि नेदरलँडसारख्या देशांवर तेलनिर्बंध लादले. अरब राष्ट्रे ही तेलाचे प्रमुख निर्यातदार असल्याने तेल निर्बंधांमुळे १९७० मध्ये तेलसंकट निर्माण झाले.
- पॅलेस्टाईनला मान्यता व पाठिंबा देण्यात अरब लीगला काहीप्रमाणात यश मिळाले.

अरब लीगचे अपयश

- अरब लीगचे निर्णय एकमताने झाल्यासच सर्व सदस्यांवर बंधनकारक असतात. अशावेळी, अरब लीगचे स्वरुप हे 'केवळ चर्चेचे ठिकाण' असे बनले आहे. अरब लीगच्या निर्णयांचे सदस्यांवर दायित्व नसल्याने संघटना आतापर्यंत प्रभावी कामगिरी करु शकली नाही.
- सदस्य राष्ट्रांना अरब लीगमध्ये आपली भूमिका ठरवणे काहीसे कठिण जात असल्याने सदस्य राष्ट्रांकडून संघटनेला निधी मिळणे कठिण जाते. यामुळे संघटनेला मानवतावादी कार्यक्रम (Humanitarian Programmes) आयोजित करणे कठीण जात आहे.

### १.४.५ अरब लीग आणि भारत

भारत आणि अरब क्षेत्र यांच्यात प्राचीन काळापासून घनिष्ठ संबंध राहिले आहेत. अरब क्षेत्र हे भारताच्या परराष्ट्र धोरणामध्ये विस्तारित शेजार (Extended Neighbourhood) या प्रकारात मोडते. पॅलेस्टाईन प्रश्नावर भारताची ठाम भूमिका, आंतरराष्ट्रीय घडामोडींवर अरब जगताशी मिळतीजुळती भूमिका आणि दृढ आर्थिक तसेच व्यापारी संबंध यामुळे भारत आणि अरब संबंध महत्वपुर्ण राहिले आहेत.

मार्च २००२ मध्ये भारताने अरब लीगसोबत चर्चात्मक देवाणघेवाणींना संस्थात्मक स्वरुप देण्यासाठी सामंजस्य करारावर (Memorandum of Understanding) स्वाक्षरी केली. या करारामुळे २००३, २००४, २००७ आणि २०१० मध्ये भारत आणि अरब लीग यांच्यात बैठका घडून आल्या. याशिवाय २००८ मध्ये अरब- भारत सहकार्य मंच (Arab- India Cooperation Forum) या सामंजस्य करारातून ११ कलमी कृती कार्यक्रम स्विकारण्यात आला. भारताने अरब लीगसोबत राजनयिक संबंध दृढ व्हावे यासाठी २०१० मध्ये कैरोमधील भारतीय राजदूतांना अरब लीगच्या कायम प्रतिनिधीत्वाचा (Permanent Representative) दर्जा दिला.

## १.५ मर्क्योसुर

मर्क्योसुर हा दक्षिण अमेरिकन व्यापार गट आहे. याला सदर्न कॉमन मार्केट, मर्क्योसुर आणि मर्कोसुल अशा विविध नावांनी ओळखले जाते. १९९१ मध्ये ॲसन्शन संधीच्या (Asuncion Treaty) माध्यमातून अर्जेंटिना, ब्राझील, पॅराग्वे आणि उरुग्वे या देशांनी परस्पर व्यापारातील आयात- निर्यात शुल्क हळूहळू काढून टाकत १९९४ पर्यंत मुक्त वाणिज्य क्षेत्रापर्यंत स्थापन करण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू केले. यातूनच मर्क्योसुर संघटनेची स्थापना झाली असे मानले जाते.

### १.५.१ मर्क्योसुरची पार्श्वभुमी व रचना-

सदस्य देशांनी ॲसन्शन संधीस १९९४ मध्ये ओरो प्रेटो प्रोटोकॉलद्वारे (Auro Preto Protocol) कायम राखले. ऑरो प्रेटो प्रोटोकॉलमुळे (१९९४) मर्क्योसुरला संघटनात्मक आणि आंतरराष्ट्रीय कायद्यांतर्गत कायदेशीर स्वरुप प्राप्त झाले असे मानले जाते. अर्थात, Latin American Free Trade Association (१९६०) आणि Latin American Integration Association (१९८०) यासारख्या प्रयत्नांतून लॅटिन अमेरिकेच्या अर्थव्यवस्थांचे एकत्रीकरण करण्याचा प्रयत्न यापूर्वीही करण्यात आला होता. १९८५ मध्ये अर्जेंटिना आणि ब्राझील यांनी अर्थव्यवस्थांच्या एकात्मतेला चालना देण्यासाठी इग्वाकू घोषणेवर (Iguacu Declaration) स्वाक्षरी केली. यानंतर दोन्ही देशांनी अनेक व्यावसायिक करारांवर वाटाघाटी केल्या. अर्जेंटिना आणि ब्राझील यांनी १९८८ मध्ये Treaty for Integration, Cooperation, and Development द्वारे १० वर्षांच्या आत एक समान बाजारपेठ स्थापन करण्यासाठी काम करण्यास वचनबद्ध केले.

सध्या मर्क्योसुर संघटनेत अर्जेंटीना, ब्राझील, पॅराग्वे आणि उरुग्वे यासारखे कायम सदस्य तर बोलिव्हिया, चिली, कोलंबिया, इक्वेडोर, गयाना, पेरू आणि सुरीनाम हे सहयोगी देश आहेत. मर्क्योसुरमधील व्हेनेझुएलाचे १ डिसेंबर २०१६ पासून पूर्ण सदस्यत्व रद्द करण्यात आले आहे. मर्क्योसुरचे मुख्यालय उरुग्वेच्या मॉन्टेव्हिडिओ येथे आहे.

मर्क्योसुरचा मुख्य उद्देश लॅटीन अमेरिकन देशांतील वस्तू, लोक आणि चलन यांच्या प्रवाहाला प्रोत्साहन देणे तसेच मुक्त व्यापार घडवून आणणे हा आहे. स्थापनेपासून मर्क्योसुरची वेळोवेळी उद्दिष्ट्ये बदलण्यात आले आहेत. लॅटीन अमेरिकन राष्ट्रांमध्ये मुक्त आंतर-क्षेत्र व्यापार आणि सदस्य देशांमधील समान व्यापार धोरण अशा मर्यादित स्वरुपात मर्क्योसुर संघटना काम करत आहे.

मर्क्योसुरची निर्णयप्रक्रिया कॉमन मार्केट कौन्सिल (Council of the Common Market-CMC), कॉमन मार्केट ग्रुप (Common Market Group-GMC) आणि मर्क्योसुर ट्रेड कमिशन (Mercosur Trade Commission- CCM) या तीन घटकसंस्थांद्वारे पार पाडली जाते. कॉमन मार्केट कौन्सिल प्राथमिक निर्णय घेणारी घटकसंस्था असून संघटनेतील राजकीय ऐक्य अबाधीत राखण्याचे काम पाहते. कॉमन मार्केट ग्रुप संघटनेच्या दैनंदिन धोरणांची अंमलबजावणी करणारी कार्यकारी घटकसंस्था आहे तर मर्क्योसुर ट्रेड कमिशनच्या मदतीने समान व्यावसायिक धोरणाची अंमलबजावणी तसेच देखरेख करणे आणि व्यापारी विवाद सोडवले जातात. याशिवाय, व्यवसाय आणि कामगार संघटनांना विचार व्यक्त करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करुन देणाऱ्या आर्थिक आणि सामाजिक मंचाची भुमिकाही मर्क्योसुरमध्ये महत्वाची आहे.

अनेक वर्षांच्या प्रयत्नांनंतर १ जानेवारी १९९५ रोजी मर्क्योसुर सदस्यांकडून इतर सदस्यांवर लादलेले अंतर्गत शुल्क कमी करण्याच्या एक मुक्त-व्यापार क्षेत्र आणि कस्टम युनियनची औपचारिक स्थापना करण्यात आली मात्र, काही अंतर्गत वस्तूंवरील सीमाशुल्काचा कायम दबदबा व इतर गैरसदस्य लॅटीन अमेरिकन राष्ट्रांकडून आयातीवर समान दर लागू करण्यास असहकार्य यामुळे मर्क्योसुर संघटना प्रभावी काम करु शकत नव्हती.

२०२२ ची आकडेवारी पाहता मर्क्योसुर ही जगातील ६ वी सर्वात मोठी अर्थव्यवस्था म्हणून उभी राहीली आहे. सध्या मर्क्योसुरने इस्रायल, इजिप्त, जपान आणि युरोपियन यूनियन यांच्याशी मुक्त व्यापार करार (Free Trade Agreement-FTA) केले आहेत.

### १.५.२ मर्क्योसुरचे यशापयश

स्थापनेनंतर सुरवातीच्या पहिल्या दशकात मर्क्योसुर संघटनेचे कार्य अर्जेंटीना आणि ब्राझील या दोन सर्वात मोठ्या सदस्य राज्यांच्या देशांतर्गत आर्थिक धोरणे आणि व्यापक राजकीय उद्दिष्टांना समायोजित करण्यात खर्च झाले. या सुरवातीच्या काळात मर्क्योसुरने सदस्य देशांना आर्थिक सुधारणा व एकीकरण प्रकल्प यांसारख्या राजकियदृष्ट्या अप्रिय धोरणात्मक बदल स्विकारण्यास भाग पाडले. अशावेळी मर्क्योसुर संघटनेच्या यशापयशाची चर्चा करणे अपेक्षित आहे.

- अधिक खुल्या प्रादेशिक बाजारपेठेची निर्मिती करण्यासाठी मर्क्योसुर संघटनेने फायदेशीर ठरणाऱ्या जकातविषयक अडथळ्यांमध्ये पद्धतशीर कपात केली. यामुळे लॅटीन अमेरिकेत थेट विदेशी गुंतवणुकीचा (एफडीआय) ओघ आकर्षित झाला.
- मर्क्योसुरच्या एकत्रीकरणाच्या प्रमुख वैशिष्ट्यांपैकी म्हणजे बहुलवादी तसेच विविधतेवर आधारित दक्षिण अमेरिकेतील स्वतःची ओळख. स्पॅनिश, पोर्तुगीज आणि

ग्वारानी भाषांना अधिकृत भाषा दर्जा देत तसेच क्षेत्रातील नागरिकांची मुक्त संचार यासारख्या सांस्कृतिक ऐक्याचा वापर मर्क्योसुर संघटना सांस्कृतिक ऐक्य स्थापन करीत आहे.

- सुरवातीपासून मर्क्योसुरने आंतरराष्ट्रीय व्यापार संबंधांचे अत्यंत खुले धोरण स्विकारत अँडीयन समुदाय, क्युबा, इस्त्रायल, चिली, इजिप्त यांच्याशी करारांवर स्वाक्षरी केली आहे. त्याशिवाय मर्क्योसुरने पॅलेस्टाईन, भारत आणि युरोपियन यूनियन यांच्याशी आंतरराष्ट्रीय व्यापार संबंधांचे खुले धोरण स्विकारले आहे. मर्क्योसुरशी व्यवहार करणाऱ्या इतर देशांमध्ये मध्य पूर्वेतील अनेक राष्ट्रे आणि दक्षिण कोरिया यांचाही समावेश आहे.

**मर्क्योसुरचे अपयश-**

- स्थापनेपासून मर्क्योसुरच्या उद्दिष्टांमध्ये वारंवार बदल झाले आहेत ज्यामुळे मर्क्योसुर ही एक स्थिर संस्था आहे असे वाटत नाही. मर्क्योसुरच्या कमकुवत निर्णयक्षमतेमुळे मूलभूत दस्तावेजांमधील नमूद उद्दिष्टे वास्तवात येऊ शकली नाहीत. ज्यामुळे मर्क्योसुर ही देशांतर्गत आणि परदेशात अविश्वासार्ह संघटना आहे अशी टीका केली जाते.

- ऑरो प्रेटो प्रोटोकॉलवरील सदस्यांच्या स्वाक्षरीमुळे डिसेंबर १९९४ मध्ये ॲसन्शन संधीस संस्थात्मकरित्या भक्कम करणे शक्य झाले. ऑरो प्रेटो प्रोटोकॉलने मर्क्योसुरच्या कॉमन मार्केट कौन्सिल आणि कॉमन मार्केट ग्रुप या दोन मुख्य संस्था स्थापन केल्या.

- मर्क्योसुरची रचना प्रादेशिक एकीकरण प्रक्रियेचे आंतरशासकीय स्वरूप प्रतिबिंबित करते. अर्थात प्रभावी नोकरशाहीच्या अभावामुळे मर्क्योसुरसाठी समान दृष्टीकोन किंवा उद्देश प्रस्तावित करणे, विकसित करणे आणि अंतिमत: अंमलात आणणे यात अडचणी येत आहेत.

- अर्जेंटिनातील आर्थिक संकटामुळे (२००१) मर्क्योसुर संघटनेतील सुरवातीच्या काळातील ऐक्य धोक्यात आल्यानंतर सर्वसमावेशक संस्थात्मक बळकटीकरण, प्रादेशिक एकात्मता अजेंडा व्यापक करण्याची महत्त्वाकांक्षा आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, मर्क्योसुरच्या भूमिकेवर पुन्हा जोर देण्याचा प्रयत्न झाला.

### १.५.३ भारत आणि मर्क्योसुर संघटना

भारत आणि मर्क्योसुर संघटना यांच्यातील संबंध प्रामुख्याने व्यापार, प्राधान्य व्यापार क्षेत्र यांसारख्या घटकांशी निगडीत आहेत.

१७ जून २००३ रोजी भारत आणि मर्क्योसुर यांच्यात फ्रेमवर्क करारावर स्वाक्षरी करण्यात आली. २५ जानेवारी २००४ रोजी नवी दिल्ली येथे या फ्रेमवर्क कराराचा एक भाग म्हणून एक प्राधान्य व्यापार करार (PTA) वर स्वाक्षरी करण्यात आली. या प्राधान्य व्यापार कराराचा उद्देश मर्क्योसुर आणि भारत यांच्यातील वर्तमान संबंधांचा विस्तार आणि बळकटीकरण करणे हा आहे. प्राधान्य व्यापार करार कार्यान्वित करण्यासाठी वाटाघाटींच्या सहा फेऱ्यांमध्ये

पाच परिशिष्टांना अंतिम रूप देण्यात आले होते. १९ मार्च २००५ रोजी नवी दिल्ली येथे G-२० बैठक संपल्यानंतर दोन्ही बाजूंनी यावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या.

या प्राधान्य व्यापार कराराद्वारे भारताने मांस आणि मांस उत्पादने, सेंद्रिय आणि अजैविक रसायने, रंग आणि रंगद्रव्ये यांसारख्या ऑफर सूचीमध्ये समाविष्ट असलेली प्रमुख उत्पादनांचा समावेश केला होता. दुसरीकडे मर्क्योसुरच्या ऑफर सूचीमध्ये सेंद्रिय रसायने, फार्मास्युटिकल्स, आवश्यक तेले, प्लास्टिक आणि वस्तू, रबर आणि रबर उत्पादने, साधने आणि अवजारे, यंत्रसामग्री, इलेक्ट्रिकल मशिनरी आणि उपकरणे यासारख्या उत्पादनांचा समावेश आहे. भारत - मर्क्योसुर प्राधान्य व्यापार करार १ जून २००९ पासून लागू झाला.

लॅटिन अमेरिकेतील सर्वात मोठी अर्थव्यवस्था असलेल्या ब्राझीलमध्ये भारतीय उत्पादित वस्तूंच्या विस्तृत श्रेणीसाठी मोठी बाजारपेठ उपलब्ध आहे. तसेच, ब्राझील हा भरपूर नैसर्गिक संसाधने असलेला देश असून भारताला विविध क्षेत्रांमध्ये विशेषतः कृषी तंत्रज्ञान, जैव-ऊर्जा, औषधनिर्माण, तेल आणि संरक्षण आणि अंतराळात मदत करू शकतो.

## १.६ आफ्रिकन यूनियन

आफ्रिकन युनियन (AU) ही आफ्रिका खंडातील ५५ सदस्य राष्ट्रांचा समावेश असलेली प्रमुख संघटना आहे. २००२ मध्ये स्थापन झालेल्या आफ्रिकन यूनियनने पूर्वीच्या ऑर्गनायझेशन ऑफ आफ्रिकन युनिटी (OAU) (१९६३-२००२) या आंतरसरकारी संस्थेची जागा घेतली. OAU ही सदस्य राष्ट्रांमधील राजकीय आणि आर्थिक एकात्मतेला प्रोत्साहन देणे आणि आफ्रिकन खंडातून वसाहतवाद आणि नव-वसाहतवाद नष्ट करणे यासाठी प्रयत्न करणारी संस्था होती. आफ्रिकन लोकांचे स्वातंत्र्य, न्याय, समानता आणि सन्मान यावर मुख्य लक्ष केंद्रित करून एकसंध आणि मुक्त आफ्रिकेसाठी हा पुढाकार घेण्यात आला. मात्र निर्णयाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सशस्त्र दलाचा अभाव, सदस्य राष्ट्रांच्या अंतर्गत बाबींत सहभागाविषयी अनास्था यामुळे OAU केवळ चर्चेचे व्यासपीठ ठरली.

### १.६.१ आफ्रिकन युनियनची पार्श्वभुमी व रचना-

OAU च्या अपयशानंतर प्रभावी African Union स्थापन झाली पाहिजे हा विचार जोर धरु लागला. OAU च्या ९ सप्टेंबर १९९९ सर्ट बैठकीनंतर सर्ट घोषणा (Sirte Declaration) स्विकारण्यात आली. या घोषणेद्वारे आफ्रिकन युनियनची स्थापना करण्याचे आवाहन करण्यात आले. आणि २००१ मध्ये लुसाका येथे, जेव्हा आफ्रिकन युनियनच्या अंमलबजावणीची योजना स्वीकारली गेली. AU चे मुख्यालय आदिस अबाबा, इथियोपिया येथे आहे.

आफ्रिकन युनियनची रचना पाहता त्यामध्ये राजकीय आणि प्रशासकीय अशा दोन्ही घटकांचा समावेश दिसतो. आफ्रिकन युनियन असेंब्ली ही संघटनेतील निर्णय घेणारी शिखर संस्था आहे. आफ्रिकन युनियन असेंब्ली संघटनेतील सदस्य राष्ट्रांच्या सर्व राज्यप्रमुख किंवा सरकारांनी बनलेली आहे. तर पॅन-आफ्रिकन संसद ही आफ्रिकन युनियनची एक प्रातिनिधिक संस्था असून त्यामध्ये सदस्य राज्यांच्या राष्ट्रीय कायदेमंडळांद्वारे निवडलेले २६५ सदस्य असतात. याशिवाय, परराष्ट्र मंत्र्यांची बनलेली कार्यकारी परिषद, स्थायी प्रतिनिधी समिती, आणि आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक परिषद (ECOSOC) या अन्य घटकांचाही समावेश आहे.

### १.६.२ आफ्रिकन युनियनची उद्दिष्टे (AU)

आफ्रिकन युनियनच्या संवैधानिक कायदा आणि आफ्रिकन युनियनच्या घटनात्मक कायद्यातील सुधारणांवरील प्रोटोकॉलद्वारे AU ची उद्दिष्टे मांडली गेली.

- आफ्रिकन देश आणि लोकांमध्ये एकता प्रस्थापित करणे.
- ५५ सदस्य देशांच्या प्रादेशिक अखंडता, सार्वभौमत्व आणि स्वातंत्र्याचे रक्षण करणे.
- आफ्रिकन खंडाच्या राजकीय तसेच सामाजिक-आर्थिक अखंडतेला गती देणे.
- आफ्रिकन खंड आणि तेथील लोकांच्या स्वारस्याच्या मुद्द्यांवर समान आफ्रिकन भुमिकेचा प्रचार करणे
- आंतरराष्ट्रीय सहकार्याला प्रोत्साहन देणे आणि खंडातील शांतता, सुरक्षा आणि स्थिरता यांना प्रोत्साहन देणे
- लोकशाही तत्त्वे आणि संस्थांसह खंडातील लोकप्रिय सहभाग आणि शासनाचा प्रचार करणे
- सामायिक व्यापार, संरक्षण आणि परराष्ट्र धोरणांचा विकास करणे.
- मानव आणि लोकांच्या हक्कांवरील आफ्रिकन चार्टरनुसार मानवी हक्कांचे संरक्षण करणे.
- सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक स्तरावर खंडाचा शाश्वत विकास साधणे.
- विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रगतीद्वारे खंडाचा विकास करणे

आफ्रिकन युनियनचा महत्वपुर्ण घटक असलेल्या शांतता व सुरक्षा परिषदेच्या २००४ पासून दारफुर, कोमोरोस, सोमालिया, डेमोक्रॅटिक रिपब्लिक ऑफ कॉंगो, बुरुंडी, आयव्हरी कोस्ट आणि इतर देशांमधील संकटांच्या संबंधात सक्रिय आहे.

### १.६.३ आफ्रिकन युनियन आणि जागतिकीकरण

आफ्रिकन देशांमधील जागतिकीकरणाच्या प्रभावाबाबत (ज्यात व्यापार, भांडवल प्रवाह आणि विशेषतः कुशल कामगारांचे अधिक स्थलांतर इ.) भिन्नता आहे. घाना, टांझानिया, केनिया आणि बोत्सवानासारख्या मूठभर देशांना देशांना जागतिकीकरणाचा जोरदार फायदा होत आहे. आफ्रिकन खंडातील जागतिकीकरणात फ्रान्स आणि ब्रिटनसारखे एकेकाळचे वसाहतवादी देश आजही राजकीय आणि आर्थिकदृष्ट्या खूप महत्त्वाचे आहेत. त्याशिवाय, अमेरिका आणि चीन अनेक दशकांपासून आफ्रिकेत सामील आहे. इतर देशांप्रमाणे भारतही आफ्रिकेत अधिकाधिक सामील होत आहे. भारत एक मुक्त लोकशाही देश असून कमी किमतीच्या पायाभूत सुविधांबाबत आफ्रिका हा भारतासाठी महत्वपुर्ण बाजारपेठ आहे.

### १.६.४ भारत आणि आफ्रिका

गेल्या दीड दशकात, भारत आणि आफ्रिका यांच्यातील व्यापारात अनेक पटीने वाढ झाली आहे. २०१८-१९ मध्ये USD ६३.३ अब्जचा द्विपक्षीय व्यापार करीत भारत हा आफ्रिका खंडातील तिसरा सर्वात मोठा व्यापारी भागीदार बनला आहे. संयुक्त राष्ट्रातील सुधारणा, दहशतवादविरोधी कारवाया, सायबर सुरक्षा आणि ऊर्जा सुरक्षा यांवर भारत आणि आफ्रिकेचे समान हितसंबंध आहेत.

भारत आणि आफ्रिका यांच्यात शिक्षण, आरोग्य, कौशल्य यांसारख्या सामाजिक पायाभूत सुविधांबाबत बहुआयामी तसेच सर्वसमावेशक सहकार्य असून त्यामध्ये आणि आफ्रिकन संस्थात्मक आणि वैयक्तिक क्षमता वाढवण्याच्या दिशेने काम करणाऱ्या राष्ट्रीय, राज्य आणि उपराष्ट्रीय घटकांचा समावेश आहे.

भारताने आफ्रिकेला कोविड-१९ साथीच्या रोगाविरुद्धच्या लढ्यात मदत केली असून विविध आफ्रिकन देशांना १५० मे. टन वैद्यकीय मदत भेट दिली आहे. 'लस मैत्री' उपक्रमांतर्गत, भारताने आफ्रिकेतील ४२ देशांना अनुदान म्हणून मेड इन इंडिया कोविड लसींचे २४.७ दशलक्ष डोस आणि व्यावसायिक आणि COVAX पुरवठा केला आहे.

सर्व राष्ट्रांच्या फायद्यासाठी महासागर मोकळे आणि मुक्त ठेवण्यासाठी आफ्रिकन देशांशी सहकार्य वाढवणे हे भारताचे एक महत्वपुर्ण उद्दिष्ट आहे. भारताच्या SAGAR (क्षेत्रातील सर्वांसाठी सुरक्षा आणि वाढ) आणि सागरमाला (बंदर विकास) उपक्रमांमध्ये तसेच AAGC (आशिया आफ्रिका ग्रोथ कॉरिडॉर) आफ्रिका समान भागीदार आहे.

## १.७ समारोप

आंतरराष्ट्रीय राजकारणात प्रादेशिक संघटना महत्वपुर्ण भूमिका बजावत असून अरब लीग, मर्क्योसुर आणि आफ्रिकन युनियन या संघटना प्रादेशिक प्रश्न प्रादेशिक स्तरावर हाताळण्याची हमी देत आहेत. प्रादेशिक संघटनामुळे राजकीय, आर्थिक तसेच सांस्कृतिक ऐक्य शक्य होत असून मुक्त व्यापार क्षेत्रासारख्या साधनांमुळे जागतिकीकरणाच्या स्पर्धेतही विकसनशील राष्ट्रे प्रभावीपणे तग धरत आहेत. अर्थात प्रादेशिक ऐक्य ही संकल्पना शेजारी राष्ट्रांतील विवाद, अविश्वास यांमुळे वेळखाऊ ठरते.

## १.८ सराव प्रश्न

- अरब लीगच्या स्थापना, उद्दिष्टे तसेच यशापयशाची चर्चा करा
- मर्क्योसुर संघटनेच्या स्थापनेची पार्श्वभुमी तसेच भारत- मर्क्योसुर संबंधांची सविस्तर चर्चा करा
- प्रादेशिकवाद आणि जागतिकीकरण यांच्यातील सहसंबंध स्पष्ट करीत आफ्रिकन युनियनच्या उद्दिष्टांची चर्चा करा

## १.९ संदर्भ


- The Interregional and Intersectoral Structure of Mercosur: An Application of Input-Output Analysis by Marco Antonio Montoya
- Inter-American Cooperation at a Crossroads by Gordon Mace
- A Handbook of International Organisations by Sonu Trivedi


❄❄❄❄❄❄❄

# २

# सुरक्षाविषयक मुद्दे आणि प्रादेशिक संघटना

**घटक रचना**

२.१ उद्दिष्टे

२.२ प्रस्तावना

२.३ नाटो (NATO - North Atlantic Treaty organisation)

२.४ शांघाय सहकार्य संघटना (SCO - Shanghai Co-operation Organisation)

२.५ विद्यापीठीय प्रश्न

२.६ संदर्भग्रंथ

## २.१ उद्दिष्टे

१) नाटो या संघटनेच्या स्थापनेची पार्श्वभूमी, उद्दिष्टे, रचना, भूमिका यांचे परीक्षण करणे

२) शांघाय सहकार्य संघटनेविषयी जाणून घेणे.

## २.२ प्रस्तावना -

आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अभ्यासात 'सुरक्षा' या संकल्पनेला अत्यंत महत्वाचे स्थान आहे. तुलनेने सुरक्षा ही संकल्पना नवीन आहे. संरक्षण आणि सुरक्षाविषयक अभ्यास, शांतता अभ्यास ही नवीन क्षेत्रे आंतरराष्ट्रीय राजकारणाचा एक स्वतंत्र विद्याशाखा विभाग म्हणून विकसित होऊ लागली तेव्हा सुरक्षेच्या अभ्यासाला महत्त्व प्राप्त झाले. सुरक्षा या संकल्पनेचा विचार करताना राष्ट्रीय सुरक्षा, आंतरराष्ट्रीय सुरक्षा, मानवी सुरक्षा अशा अनेक पैलू संकल्पनांचा विचार करावा लागतो.

वास्तविक पाहता, प्राचीन- मध्ययुगीन काळापासून सुरक्षा ही संकल्पना अस्तित्वात आहे. प्राचीन काळात राज्याची सुरक्षा महत्वाची मानली जात. आज मात्र देशाची म्हणजेच राष्ट्रीय सुरक्षा प्रत्येक राष्ट्रासाठी महत्वाची मानली जाते. प्रत्येक राष्ट्र आपल्या देशाची सुरक्षा टिकविण्यासाठी प्रयत्नशील असते.

आंतरराष्ट्रीय राजकारणात हितसंबंधावरून राष्ट्रा – राष्ट्रांमध्ये संघर्ष होत असतात. भौगोलिकतेने सीमित असलेल्या राष्ट्र- राज्यांमध्ये संघर्ष उत्पन्न होतात तेव्हा राज्यांच्या भौगोलिक सीमा, सार्वभौमत्वाला धोके निर्माण होतात. मुख्यत: असे धोके लष्करी असतात. दोन राष्ट्रांमध्ये संघर्ष निर्माण झाल्यास त्याची परिणती एका राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्रावर आक्रमण करण्यात होऊ शकते. यातून दुसऱ्या राष्ट्रांच्या सीमांना धोके निर्माण होतात. त्या राष्ट्राच्या सार्वभौमत्वाला आव्हान दिले जाते. असे आव्हान आक्रमक राष्ट्राच्या लष्करी सामर्थ्यामुळे निर्माण होते. या धोक्याचा प्रतिकार करण्यासाठी प्रत्येक राष्ट्राला स्वतःचे लष्करी सामर्थ्य बाळगणे आवश्यक ठरते. लष्करी आव्हानाचा प्रतिकार लष्करी सामर्थ्याच्या

आधारे केला जाऊ शकतो. प्रतिस्पर्धक राष्ट्राला आपल्यावर हल्ला करण्याच्या विचारापासून परावृत्त करू शकेल इतके संरक्षणात्मक लष्करी सामर्थ्य बाळगणे हा सुरक्षेचा उपाय आहे.

या पार्श्वभूमीवर आंतरराष्ट्रीय राजकारणात प्रामुख्याने दुसऱ्या महायुद्धानंतर काही लष्करी संघटनांची निर्मिती करण्यात आली. उदा. नाटो, वार्सा पॅक्ट, सिऍटो. विश्वातील विविध राष्ट्रांनी महासत्तांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या या लष्करी संघटनांचे सदस्यत्व स्वीकारले.

प्रस्तुत प्रकरणात आपण नाटो, शांघाय सहकार्य संघटना या विषयी माहिती पाहणार आहोत.

## २.३ NATO-North Atlantic Treaty org.

दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक राजकारणाची सर्व समीकरणे बदलली आणि जगातील बहुतांशी राष्ट्रे साम्यवादी रशिया आणि भांडवलशाही अमेरिका या दोन महासत्तांत विभागली गेली. त्यातूनच NATO, SEATO, वॉर्सा पॅक्ट यासारखे लष्करी करार अस्तित्वात आले. यापैकी NATO – म्हणजे North Atlantic Treaty organization.

### २.३.१ NATO च्या स्थापनेची पार्श्वभूमी –

साम्राज्यवादी महत्वाकांक्षा, राष्ट्रवाद आणि शस्त्रास्त्र स्पर्धा यातून पहिले महायुद्ध व पहिल्या महायुद्धाचा वचपा काढण्यासाठी दुसरे महायुद्ध लढले गेले. दुसऱ्या महायुद्धामुळे ब्रिटन, फ्रान्स, जर्मनीसारखी आर्थिकदृष्ट्या बलाढ्य राष्ट्रे देखील डबघाईला आली, परंतु अमेरिका मात्र श्रीमंत बनली कारण अमेरिकेच्या भूमीवर प्रत्यक्ष युद्ध लढले गेले नाही. तसेच युद्धकाळात इतर राष्ट्रांना शस्त्रास्त्रे तसेच इतर जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा केल्यामुळे अमेरिकेने अमाप नफा मिळवला. या महायुद्धात अमेरिकेने जपानवर अणुबॉम्बचा वापर केल्याने, अमेरिका जागतिक महासत्ता म्हणून उदयास आली.

स्टालिनच्या नेतृत्वाखाली सोव्हियत युनियननेही विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्रात प्रगती करून अमेरिकेच्या एकाधिकार शक्तीला आव्हान दिले म्हणून रशिया ही जगातील दुसरी महासत्ता म्हणून मान्यता पावली. या दोन्ही महासत्ता परस्परविरोधी शासनपद्धती व विचारप्रणालीच्या असल्यामुळे त्यांच्यात जास्त काळ मित्रत्व टिकणार नाही ही पूर्वोक्ती खरी ठरून जग पुन्हा दोन महासत्तांत विभागले गेले आणि शीतयुद्धास सुरुवात झाली. रशियाने चीनसारख्या साम्यवादी राष्ट्रास मदत केली तर अमेरिकेने आपल्या भांडवलशाहीच्या जोरावर अनेक देशात लोकशाही रुजवण्याचा प्रयत्न केला व आपापसातील संघर्षातून NATO सारख्या संघटनेचा जन्म झाला.

रशिया आपला साम्यवादाचा प्रभाव वाढवीत असताना युरोपातील पूर्वेकडील अनेक देशांवर त्याचा प्रभाव पडायला सुरुवात झाली होती. म्हणूनच अमेरिकने उत्तर अटलांटिक महासागराच्या क्षेत्रात येणाऱ्या देशांना साम्यवादाच्या प्रभावापासून दूर ठेवण्यासाठी एक संघटना स्थापन केली. त्यास NATO अर्थातच 'उत्तर अटलांटिक संधी संघटना' असे म्हणतात.

दि. ४ एप्रिल १९४९ रोजी वॉशिंग्टन येथे झालेल्या सभेमध्ये सदस्य देशांनी स्वाक्षऱ्या केल्या आणि त्याचवर्षी ऑगस्टपासून ही संघटना कार्यरत झाली.

- स्थापना - १९४९
- मुख्यालय - बेल्जियमची राजधानी बुसेल्स.

### २.३.२ सदस्य राष्ट्रे -

सुरुवातीच्या काळात NATO ची १२ सदस्यराष्ट्रे होती ती म्हणजे अमेरिका, कॅनडा, ब्रिटन, फ्रान्स, बेल्जियम, नेदरलँण्ड, लक्झेम्बर्ग, इटली, नोर्वे, आईसलॅण्ड, डेन्मार्क पोर्तुगाल इ. १९५२ मध्ये तुर्कस्तान आणि ग्रीस, १९५५ मध्ये जर्मनी, १९८२ मध्ये स्पेन, १९९७ मध्ये झेक प्रजासत्ताक, पोलंड आणि हंगेरी ही राष्ट्रे NATO त सामील झाली. सध्या NATO त २६ सदस्य राष्ट्रे आहेत.

### २.३.३ उद्दिष्टे

१) सभासद राष्ट्रांच्या सुरक्षेचे आणि स्वातंत्र्याचे रक्षण

२) युरो- अटलांटिक क्षेत्रातील स्थैर्याची जपणूक

३) युरोपीय प्रदेशांचे संरक्षण करणे व साम्यवादाला विरोध करणे

४) या करारातील ५ वे कलम म्हणजे एखादया सदस्य राष्ट्रावरचे आक्रमण म्हणजे सर्व सहकारी राष्ट्रांवरचे आक्रमण समजले जावे व आक्रमणाचा प्रतिकार सर्व राष्ट्रांनी सामूहिकरीत्या करावा व आवश्यकता भासल्यास सैनिकी कारवाई करावी. अशा आक्रमणाची व त्यासंबंधी NATO ने केलेल्या कारवाईची सूचना सुरक्षमंडळास ताबडतोब दयावी लागते. सुरक्षा मंडळाने शांतता प्रस्थापित करण्याबाबत कारवाई सुरू केली की NATO ने आपली कारवाई थांबवावी अशी तरतूद आहे.

### २.३.४ रचना :-

१) उत्तर अटलांटिक परिषद हा संघटनेतील सर्वश्रेष्ठ घटक आहे. या परिषदेच्या वर्षातून दोन-तीन बैठकी होतात. यामध्ये प्रत्येक सभासद राज्याचे संरक्षणमंत्री किंवा विदेशमंत्री भाग घेत असतात. या संघटनेचे मुख्य कार्यालय पॅरिसमध्ये आहे. ही परिषद आपला सभापती निवडत असते.

२) सचिवालय - संघटनेच्या कार्यासाठी एक सचिवालय असते. त्यात एक सचिव व इतर कर्मचाऱ्यांचा समावेश असतो. सचिवाची नेमणूक परिषद करते.

३) सैनिक समिती - NATO ची एक सैनिक समिती आहे. या समितीत सदस्य राज्यांच्या मुख्य अधिकाऱ्यांचा समावेश असतो. परिषदेला सैनिकी कारवाईबाबत सल्ला देणे हे सैनिकी समितीचे कार्य आहे. या समितीची बैठक वर्षातून २-३ वेळा होते. इ.स. १९५० मध्ये परिषदेनें युरोपच्या संरक्षणासाठी सर्व सभासद राज्यांची एक संयुक्त सेना निर्माण केली व या संयुक्त सैन्यास मुख्य कार्यालयाच्या देखरेखीखाली ठेवण्यात आले होते.

याशिवाय NATO च्या दोन सैनिक कमांड आहे त्या म्हणजे Atlantic Sea Command व Channel Command. इ. स. १९५३ मध्ये NATO मधील अमेरिकन सैन्यास अण्वस्त्रांनी सुसज्ज करण्यात आले.

NATO संघटनेस अमेरीकेची आर्थिक मदत् सर्वाधिक मिळते. एकूण खर्चाच्या ४/५ भाग अमेरिकाच खर्च करते. युरोपीय राज्यांना आर्थिक मदत करून या भागातील साम्यवादाचा प्रसार रोखणे हे यामागील अमेरिकेचे उद्दिष्ट आहे.

### २.३५ NATO संघटनेतील चढ-उतार

जागतिक सहकार्याच्या वातावरणामुळे मध्यंतरी शीतयुद्धाचा प्रभाव कमी झाला. फ्रान्सने NATO वर संदेह व्यक्त करून बाहेर पडण्याची घोषणाही केली होती. गोव्याच्या प्रश्नाबाबत NATO ने सक्रिय मदत न केल्यामुळे पोर्तुगालने NATO बद्दल नाराजी व्यक्त केली. त्यामुळे NATO संघटन नष्ट होण्याच्या मार्गावर होते. इ.स १९६७-६८ मध्ये अशा काही घटना घडल्या की, ज्यामुळे NATO संघटन पुन्हा प्रभावी बनले.

इ. स. १९६७ मध्ये अरब-इस्त्रायल युद्ध सुरु झाल्यामुळे रशियाने आपले सैन्य भूमध्य सागरामध्ये उभे केले. त्यामुळे पुन्हा एकदा NATO मधील सदस्य जागे झाले. ग्रीस व तुर्कस्तानला या घटनेने चिंताग्रस्त केले व त्यांनी अमेरिकेकडे नाविक शक्ती वाढविण्यास मदत मागितली. तसंच झेकोस्लोव्हाकियामध्ये रशियाने ससैन्य हस्तक्षेप केला. या घटनेमुळे NATO सदस्य पुन्हा संघटित होण्याचा विचार करू झाले लागले. यापूर्वी ब्रिटन व अमेरिकेने आपले NATO मधील सैन्य काढून घेण्यास सुरुवात केली होती व त्यामुळे NATO एक औपचारिक संघठन राहील असे वाटत होते. परंतु झेकोस्लोव्हाकियाच्या घटनेने NATO ला पुन्हा सक्रिय बनवले त्याचप्रमाणे सोव्हियत संघाने प. जर्मनीच्या प्रश्नावर हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केल्यामुळे NATO ने लव्करी कारवाई करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे NATO पुन्हा सक्रिय झाल्याचे दिसून आले.

या घटनांमुळे फ्रान्सने NATO चे सदस्यत्व सोडण्याचा विचार लांबणीवर टाकला. अमेरिका ब्रिटनने आपले सैन्य पश्चिम जर्मनीच्या संरक्षणार्थ पुन्हा पाठविण्याचा निर्धार केला. पोर्तुगालने NATO चे क्षेत्र दक्षिण अटलांटिकपर्यंत वाढवावे अशी सूचना केली. या सर्व कारणांमुळे NATO पुन्हा क्रियाशील संघटन बनले.

NATO करार हे एक शिथिल संघटन आहे. यामधील राष्ट्रांमध्ये वॉर्सा कराराप्रमाणे परिदृढ संघटन आढळत नाही. NATO संबंधी अमेरिकेच्या वर्चस्वाला न जुमानण्याची फ्रान्सची प्रवृत्ती आढळते. परंतु या करारांतर्गत असलेल्या राष्ट्रांचे परस्परांत युद्ध झाल्याचाही प्रसंग घडले आहे. जुलै १९७४ मध्ये सायप्रस बेटावरून ग्रीस - तुर्कस्तान युद्ध झाले. तेव्हा ग्रीसने NATO तून बाहेर पडण्याची घोषणा केली. अशाप्रकारे NATO संघटनेत अनेक चढ-उताराचे प्रसंग घडलेले आढतात.

### २.३.६ नाटो आणि इराक-

सप्टें ११ नंतर अमेरिकेने दहशतवादाविरुद्ध लढा पुकारला. आधी अफगाणिस्तान आणि नंतर इराकमध्ये युद्ध झाले. सुरुवातीच्या काळात इराक युद्धाला NATO तील युरोपियन

देशांचा विरोध होता. परंतु २६ जून, २००४ रोजी आयर्लंड मधील European Union - America (EU-US Summit) बैठकीत करार झाला, त्यानुसार असे ठरले की, NATO इराकच्या पुनर्बांधणीत मदत करेल. NATO इराकी लोकाना त्यांच्या सुरक्षा दलाच्या बांधणीत मदत करावी. यालाही EU ने मान्यता दिली

### २.३.७ पाकिस्तान: NATO बाह्य मित्र राष्ट्र

इराक युद्धानंतर अमेरिकेने पाकीस्तानला 'NATO बाह्य मित्र राष्ट्र' हा दर्जा बहाल केला. हा दर्जा ऑस्ट्रेलिया, बहारीन, इस्त्रायल, द. कोरिया व मोरोक्को अशा काही निवडक राष्ट्रांनाच मिळालेला आहे. या दर्जामुळे पाकला अधिक संरक्षणसामुग्री घेता येईल, तसेच संशोधनासाठी कर्जही मिळेल. हा दर्जा वॉशिंग्टनने इस्लामाबादला त्याच्या सहकार्याबद्दल बक्षीस म्हणून दिल्याचे समजते.

### २.३८ NATO चे परीक्षण-

NATO च्या वाटचालीचे परीक्षण केल्यास असे लक्षात येते की, NATO ही पूर्णत: क्षेत्रीय किंवा प्रादेशिक संघटना नाही. कारण ग्रीक व तुर्कस्थानसारखे बिगर अटलांटिक राष्ट्रे देखील यात समाविष्ट आहेत. साम्यवादी रशियाच्या प्रभावापासून राष्ट्रांना दूर ठेवणे व जगात आपले राजकीय वर्चस्व प्रस्थापित करणे हेच NATO चे व अप्रत्यक्षपणे अमेरिकेचे प्रमुख उद्दिष्ट होते. त्यामुळे जागतिक तणाव वाढत जाऊन शीतयुद्धास अनुकूल वातावरण तयार झाले. तसेच NATO आपल्या सदस्य राष्ट्रांमधील संघर्षही मिटवू शकलेली नाही पण तत्कालीन परिस्थितीचा विचार करता संपूर्ण जगावर आपले वर्चस्व राहावे हा एकमेव हेतू डोळ्यासमोर ठेवून अमेरिकने NATO ची स्थापना केल्याचे दिसते.

NATO कराराचे परीक्षण करताना जे पेडलफोर्ड असे म्हणतात की, "अमेरिकेने NATO संघटनेमागे आपली सर्व शक्ती उभी केलेली नाही. स्वतंत्र युरोपला सशस्त्र करण्यासाठी NATO ही एक उपयुक्त संघटना आहे. या उद्देशानेच अमेरिका या संधीकडे पाहते."

प्रा. सुमन यांच्या मते, अमेरिकेने कॅनडा व इतर दहा युरोपीय राज्यांचे साम्यवादी आक्रमणापासून संरक्षण व्हावे यासाठी हा परस्पर संरक्षणाचा करार केलेला आहे. प. युरोपला शीघ्रतेने शस्त्रसंपन्न करण्यासाठी NATO करार करण्यात आला. परंतु प्रत्यक्षात या अपेक्षा पूर्ण झालेल्या आढळत नाही.

१९९१ ला शीतयुद्ध संपले. १९९७ च्या मॅड्रिक  संमेलनात पोलंड, हंगेरी व झेक रिपब्लिकला NATO त  समाविष्ट करून घेण्यात आले. १२ मार्च १९९९ ला वॉर्सा कराराची भूतपूर्व सदस्यराष्ट्रे पोलंड, हंगेरी आणि झेकोस्लोव्हाकिया यांना NATO चे सदस्यत्व देण्यात आले. या राष्ट्रांच्या प्रवेशामुळे NATO चा विस्तार पूर्वेकडे ४०० मैल झाला.

NATO संघटनेने या भूतपूर्व साम्यवादी राज्यांच्या संरक्षणाची जबाबदारी स्वीकारली आहे. या नव्याने सभासदस्यत्व घेतलेल्या राज्यात वैचारिक परिवर्तन होऊन तेथे बहुपक्षीय लोकशाही व मुक्त व्यापार सुरु झाला आहे. परंतु सैनिकी व तांत्रिक प्रगतीच्या दृष्टीने त्यांची विचार करण्याची पद्धती सोव्हिएत संघाप्रमाणेच आहे. सदस्य राष्ट्रांप्रमाणे सैनिकी दृष्टि

बदलण्यास बऱ्याच वेळ लागेल. नव्या सदस्य राष्ट्रांमुळे NATO संघटनेत चैतन्य निर्माण झालेले दिसते.

## २.४. शांघाय सहकार्य संघटना (SCO Shanghai Co-operation Organisation)

**प्रस्तावना:**

शांघाय सहकार्य संघटना ही एक आंतरराष्ट्रीय संघटना असून, तिची स्थापना १५ जून २००१ मध्ये शांघाय येथे झाली. चीन, रशिया, कझाकस्तान, किरगिझीस्थान, ताजिकीस्तान आणि उझबेकिस्तान या सहा राष्ट्रांचा या संघटनेच्या स्थापनेत सहभाग आहे. प्रादेशिक संघटना म्हणून युरेशियातील एक अत्यंत यशस्वीपणे कार्यरत असलेली संघटना आहे. जिचा मुख्य उद्देश म्हणजे प्रादेशिक सुरक्षिततेचे रक्षण करणे.

### २.४.१ मुख्यालय:- सेंट पीटर्सबर्ग,

### २.४.२ सदस्य राष्ट्रे :-

चीन, कझाकस्तान, रशिया, ताजिकीस्तान, उझबेकिस्तान याशिवाय २००५ पासून भारत, इराण, मंगोलिया, पाकिस्तान ह्या राष्ट्रांना २०१२ मध्ये अफगाणीस्तान निरीक्षकांचा दर्जा देण्यात आला असून, श्रीलंका आणि बेलारूस तुर्की ही राष्ट्रे संवाद भागीदार आहे:

### २.४.३ उदय आणि विकास :-

१९९६ मध्ये चीन आणि रशिया यांनी पुढाकार घेऊन शांघाय -५ या संघटनेची स्थापना केली. चीन आणि रशिया व्यतिरिक्त या संघटनेत कझाकस्तान, किरागझीस्तान, व ताजिकिस्तान या राष्ट्रांचा समावेश होता. आणि म्हणून ही संघटना 'शांघाय - ५' म्हणून ओळखली जात होती. ही संघटना स्थापन करण्यामागील मूळ उद्देश म्हणजे सीमाप्रदेशातील तंटयांचे शांततापूर्ण निराकरण करणे.

त्यावेळी रशियन राष्ट्राध्यक्ष येल्त्सीनच्या पाश्चात्य देशांच्या बाजूला झुकणाऱ्या धोरणाने रशियाची दिशाभूल झाली होती पण रशियाच्या नव्या नेतृत्वाने पूर्वेकडील आपल्या देशांकडे आपले लक्ष वळविण्याचे ठरवले. अर्थात हे चीनच्या फायदयाचे ठरले. कालांतराने उझबेकिस्तान व मंगोलिया यांचीही या संघटनेत भर पडली. २००० मध्ये उझबेकिस्तानला निरीक्षक राष्ट्राचा दर्जा देण्यात आला. जून २००१ मध्ये शांघाय - ५ या संघटनेत मध्य आशियातील इस्लामिक दहशतवादाविरुद्ध लढा देण्यासाठी आणि प्रादेशिक सुरक्षितता निश्चित करण्यासाठी एक निवेदन प्रसिद्ध केले. त्यानंतर उझबेकिस्तानचा या संघटनेत प्रवेश झाला.

जून २००२ मध्ये पूर्वीच्या सहा सदस्य राष्ट्रांच्या नेत्यांनी मॉस्कोतील सेंट पीटर्सबर्ग येथे शांघाय सहकार्य संघटनेची (SCO) स्थापना केली. आणि सदस्य राष्ट्रांनी संघटनेच्या सनदेवर सह्या केल्या. जागतिक मुत्सद्देगिरीच्या भाषेत बोलायचे झाले तर चीन व रशिया या महासत्तांच्या परस्पर हितसंबंधांच्या संगमातून शांघाय सहकार्य संघटनेची निर्मिती झाली आहे. त्यात पूर्वीच्या सोव्हिएत रशियामधील मध्य आशियातील देशांचा सहभाग आहे. अर्थात

तत्वत: या संघटनेचे सदस्य देश परस्परांच्या हिताच्या जपणुकीसाठी एकत्र आले. परस्पर सामंजस्य, समता, सल्ला मसलत, एकमेकांच्या भिन्न संस्कृतीबद्दल आदर आणि संयुक्त विकासकार्य हीच एकत्र येण्याची उद्दिष्टे होती.

SCO च्या सनदेत असे म्हटले आहे की, नवी संघटन लष्करी युती नाही, तर प्रादेशिक सहकार्यासाठी ही संघटना आस्तित्वात आली आहे.

या सहा मूळ सदस्य राष्ट्रांनी एका राजकीय जाहीरनाम्यावर सही केली आहे. त्यात प्रादेशिक सुरक्षितता, आर्थिक सहकार्य, आणि मानवहितवादी सहकार्य या तीन गोष्टींना प्राधान्य देण्यात आले आहे.

जाने २००४ मध्ये SCO ने कायमस्वरूपी सचिवालय आणि Anti - Terrorist गटाची स्थापना केली आहे.

### २.४.४ उद्दिष्टे

१) सीमाप्रदेशातील तंटयांचे शांततापूर्ण निराकरण करणे.

२) सदस्य राष्ट्रात परस्पर सामंजस्य निर्माण करणे

३) प्रादेशिक स्थैर्य, शांती व सुरक्षा निर्माण करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे

४) सदस्य राष्ट्रांमध्ये परस्पर विश्वास व सहकार्य निर्माण करणे

५) लोकशाहीवादी, न्याय, राजकीय-आर्थिक सुव्यवस्था स्थापित करण्यासाठी नवीन एकत्रित धोरणांची निर्मिती करणे.

६) एकमेकांच्या भिन्न संस्कृतीबद्दल आदर बाळगणे.

### २.४.५ रचना:-

SCO

Council of Heads of state

Council of Heads of Government (prime ministers)

Head of ministers. Council of foreign ministers

Commission of Senior officials       Council of National Coordinators

Regional.

Special working Group secretariat Regional Anti- Terrorist Structure (RATS)

१) Council of Heads of state

ही SCO ची राज्यप्रमुखांची एक परिषद असून, निर्णय घेणारी एक महत्वपूर्ण संस्था आहे. या परिषदेतील राज्यप्रमुख वर्षातून एकदा SCO summits मध्ये भेटतात. आणि हे summits दरवर्षी कोणत्याही एका सदस्य राष्ट्राच्या राजधानीच्या शहरात बोलवले जातात.

२) The Council of Heads of Government :-

यामध्ये सदस्य राष्ट्रांच्या शासनप्रमुखांचा म्हणजेच पंतप्रधानांचा समावेश होतो. Council of Heads of Government ही SCO चे दुसरे महत्वपूर्ण अंग आहे. ही परिषद वार्षिक परिषदांवर (annual summits) वर नियंत्रण ठेवते. तसेच या परिषदांमध्ये शासनप्रमुख बहुपक्षीय सहकार्याच्या प्रश्नांवर चर्चा करतात. त्याचप्रमाणे SCO वार्षिक अंदाजपत्रकाला ही परिषद मंजुरी देते.

३) The Council of foreign ministers:

यामध्ये सदस्य राष्ट्रांच्या विदेश मंत्र्यांचा समावेश होतो. या परिषदेच्या नियमित बैठका होत असून, त्यामध्ये प्रचलित आंतरराष्ट्रीय परिस्थिती आणि SCO व इतर आंतरराष्ट्रीय संघटना यांच्यातील संबंधावर चर्चा केली जाते.

४) The Council of National Coordinators:-

ही परिषद SCO च्या सनदेत जाहीर केलेल्या आराखड्यानुसार सदस्य राष्ट्रांमध्ये बहुपक्षीय सहकार्यासंबंधी समन्वय साधण्याचे कार्य करते.

५) Secretariat :-

SCO चे सचिवालय हे संघटनेचे प्राथमिक कार्यकारी यंत्रणा आहे. परिषदेने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याचे कार्य सचिवालय करते. त्याचप्रमाणे धोरणांचा मसुदा तयार करते. तसेच SCO च्या ध्येयधोरणानुसार विविध उपक्रम सदस्य राष्ट्रांसाठी आयोजित करते.

SCO चे सचिवालय चीनमधील बीजिंग येथे आहे. सचिवालयात एक महासंचालक व त्यांना मदत करण्यासाठी इतर काही अधिकारी-कर्मचारी असतात. सध्या SCO चे महासंचालक कझाकस्तानचे Muratbek Imanaiyev हे आहे. Muratbek Imanaiyev हे कझाकस्तानचे माजी परराष्ट्र मंत्री आणि American University of Central Asia चे प्राध्यापक आहेत.

६) The Regional Anti-Terrorist structure (RATS) :

RATS चे मुख्यालय उझबेकिस्तान मधील ताश्कंद येथे आहे. RATS ची स्थापना जून २००४ मध्ये झाली RATS च्या प्रमुखाची निवड तीन वर्षासाठी केली जाते. प्रत्येक सदस्य राष्ट्र RATS मध्ये कायमस्वरूपी प्रतिनिधी पाठवित असते.

RATS हे SCO चे कायमस्वरूपी अंग असून, ते दहशतवाद, अलगतवाद आणि जहालमतवादी राजकारणाविरोधात सहकार्य करण्यासाठी सदस्यराष्ट्रांना उत्तेजन देते.

याशिवाय SCO मध्ये सदस्य राष्ट्रांच्या विविध खात्यांच्या मंत्र्यांचा समावेश होतो. त्याखालोखाल वरिष्ठ कार्यालयीन आयोग कार्यरत आहे. तसेच SCO ने विशेष कार्यालयीन गटाची व अशासकीय संस्थांची निर्मिती केली आहे. जसे उदा.

SCO Business Council, SCO Interbank Consortium, SCO fourm इ.

## २.४.६ कार्यक्रम व भूमिका / मूल्यमापन:-

स्थापनेपासूनच SCO ने राष्ट्राराष्ट्रांतील सीमाप्रश्न सोडविण्यावर भर दिला आहे. काही प्रमाणात संघटनेला यश प्राप्त झाले आहे. गेल्या १० वर्षात शेजारील राष्ट्रात बरेच सौहार्दाचे वातावरण निर्माण झाले आहे, यात शंका नाही. रशियाबरोबर उसुरी नदीच्या प्रदेशात एकेकाळी चीनचा सीमा संघर्ष झाला होता. तो तंटा शांतपणे मिटला व रशियाने स्वखुशीने काही भाग चीनच्या स्वाधीन केला. त्याचप्रमाणे कझकस्तान आणि किरगिझीस्तान कडूनही ऐतिहासिक आधारावर चीनने हजारो चौरस किमी चा प्रदेश मिळवला पण ज्यावेळी किरगिझीस्तानने काही प्रदेश चीनच्या स्वाधीन केला तेव्हा त्याला अंतर्गत संघटना व गटांचा प्रखर विरोध झाला. SCO आजपर्यंत राष्ट्राराष्ट्रांच्या सीमाप्रश्नासंबंधी अनेक उपाय योजले आहे.

सदस्य राष्ट्रांचे नेते दरवर्षी एकत्र येऊन परस्पर संबंध दृढ करण्याचे काम करीत असतात. त्यांची उद्दिष्टे, क्षमता, संथपणे व निश्चित प्रगती यांच्याकडे सर्व जगाचे लक्ष वेधले गेले आणि त्यांची प्रशंसाही झाली, होत आहे. या संघटनेने इतक्या काळात प्रादेशिक महत्त्व तर प्राप्त केले आहे, पण व्यापार, दहशतवाद आणि अंमली पदार्थाचे दळणवळण यांना प्रतिबंध करण्यातही या संघटनेने बऱ्याच प्रमाणात यश मिळवले आहे. त्यामुळे शांघाय संघटनेशी सहकार्य करून संबध वाढविण्याची इच्छा अनेक देशांनी प्रदर्शित केली आहे. चीन व रशिया संयुक्त लष्करी कवायतीचा उपक्रम हाती घेऊन सदस्य देशांच्या सुरक्षिततेचा इशारा इतर राष्ट्रांच्या निदर्शनास आणून देण्याचे काम करीत आहे. पहिली कवायत २००३ मध्ये कझाकस्तान व २ री चीन येथे. तसेच संघटना सदस्य राष्ट्रांना व्यापार, उद्योग, गुंतवणूक, प्रादेशिक व्यापार, वाहतूक- दळणवळण, पर्यटन इ. क्षेत्रात विकास करण्यासाठी सतत पाठिंबा देत असते आणि त्याअनुषंगाने आपली ध्येयधोरणे ठरवित असते. त्याचप्रमाणे आर्थिक क्षेत्रातही SCO ने महत्वपूर्ण भूमिका बजावली आहे. २३ सप्टें. २००३ रोजी SCO सदस्य राष्ट्रांनी आर्थिक सहकार्यासाठी कृती आराखड्यावर सह्या केल्या. याचाच पुढचा भाग म्हणून सन २००४ मध्ये सदस्य राष्ट्रांनी १०० कृती योजनांवर (Action plan) सहया करून त्यांना मंजुरी दिली. तसेच सन २००५ च्या मॉस्को समिटमध्ये भविष्यातील संयुक्त प्रकल्प निधीसाठी सदस्यांनी आंतर बँक (Inter- Bank) स्थापन करण्याचे मान्य केले. त्यानंतर फेब्रुवारी २००६ मध्ये बीजिंग येथे SCO Interbank Association ची पहिली बैठक घेण्यात आली.

राजकीय लष्करी - आर्थिक सहकार्याबरोबरच SCO ने सांस्कृतिक सहकार्यालासुद्धा प्राधान्य दिले आहे. एप्रिल २००२ मध्ये SCO च्या सदस्य राष्ट्रातील सांस्कृतिक मंत्र्यांची बैठक बीजिंगमध्ये घेण्यात आली. आणि त्यासंबंधी सहकार्याच्या निवेदनावर सदस्यराष्ट्रांनी सह्या केल्या.

असे असले तरी या संघटनेत काही समस्या, उणिवा असल्याचे लक्षात येते. सदस्य राष्ट्रांत काही प्रश्नांवरून मतभेद आहेत. उदा. भारत, पाकिस्तान आणि इराण ही राष्ट्रे या संघटनेचे सदस्यत्व मिळविण्यास उत्सुक आहेत. रशिया देखील त्यांना सतत पाठिंबा देत आला आहे. पाकला चीनचा पाठिंबा आहे, पण रशियाने असा आग्रह धरला आहे की, पाकला प्रवेश द्यायचा असेल तर भारतालाही प्रवेश दयावा लागेल. परंतु भारत आणि चीन यांच्या दरम्यान

सीमारेषेजवळ काही मतभेद व संघर्षजन्य परिस्थिती असल्यामुळे चीनने या प्रस्तावाला संमती दर्शवली नाही. आणी चीनची ही कृती SCO च्या उद्देशांशी विसंगत आहे. रशिया आणि चीन हे दोघेही इराणच्या बाबतीत अनुकूल आहेत पण असे करून पश्चिमी देशांना ते नाखूश करू इच्छित नाही. पण या विचारांना पुष्टी देण्यासाठी असा युक्तिवाद केला जातो की, सध्याच्या पाच राष्ट्रांच्या या संघटनेचा विस्तार केला तर कदाचित सहकार्याला बाधा येऊ शकते.

एकंदरित रशिया आणि चीन यांचा ही संघटना स्थापन करण्याचा मुख्य उद्देश अमेरिकेचा मध्य आशियातील प्रभावाला मर्यादा घालणे हाच होता, पण ९/११ च्या दहशतवादी हल्ल्यानंतर उझबेकस्तान आणि किरगिझीस्तान या राष्ट्रांनी अमेरिकेला तळ ठोकण्यास संमती दिली आहे. त्या मोबदल्यात त्यांना घसघशीत भाडेही मिळते. हे तळ कायमचे राहणार नसले तरी या प्रदेशातील अमेरिकेचे वास्तव्य रशिया आणि चीनला फारसे रुचलेले नाही.

या संघटनेवर प्रामुख्याने चीनचे वर्चस्व जाणवते. गेल्या १० वर्षात कझाकस्तान यांच्याबरोबरी 'उईगूर' या सीमाप्रदेशातील आतंकवादी चळवळीवर काबू मिळविण्यात चीन खूपच यशस्वी झाला आहे. त्याचप्रमाणे शरीया व मध्य आशियाबरोबर आर्थिक संबंध प्रस्थापित करून चीन हा प्रमुख आंतरराष्ट्रीय व्यापार करण्यात यशस्वी झाला आहे. या देशांच्या सहाय्याने यंत्रसामुग्री, उपभोग्य वस्तू, उच्च-तांत्रिक उपकरणे इ. च्या निर्यातीत चीन अग्रभागी आहे या सर्व देशात लक्षावधी डॉलर्सची गुंतवणूक चीनने केली आहे. याहूनही महत्वाचे म्हणजे गेल्या पाच वर्षांत चीनने या दुसऱ्या सदस्य देशांकडून पाईपलाईनने तेल व वायू मिळविण्यात यश मिळवले व आपल्या उर्जेची मागणी पुरी करण्याच्या दिशेने मोठे पाऊल उचलले आहे. थोडक्यात, SCO वर चीनची मक्तेदारी दिसून येते.

भविष्याचा विचार केला तर एका पाश्चात्य विश्लेषकाने असे मत व्यक्त केले आहे की, SCO ही संघटना यशाची वाटचाल निश्चितच करीत राहील, पण त्यासाठी मॉस्को - बीजिंग मधील युतीमध्ये कोणताही हितसंघर्ष व राजकीय मतभेदांचा अडथळा येत नाही तोपर्यंतच हे यश टिकून राहिल. या संघटनेचे बळ जसे वाढेल तसा अमेरिकेचा मध्य आशियातील - प्रभाव कमी होत जाईल, पण SCO चा विकास करण्यासंबंधी राशिया व चीन यांच्यामधील मतभेद प्रकाशात येत आहे. रशियाला जागतिक स्तरावर आपला राजकीय प्रभाव टाकण्यात रस आहे. तर चीनला सभासद राष्ट्रांबरोबरच आर्थिक-व्यापारी संबंध वाढवायचे आहे. भारत आणि रशिया यांचे संबंध मैत्रीचे असल्यामुळे या संघटनेचे बळ वाढविण्याला चीनने पाठिंबा देणे आवश्यक आहे. कारण त्यात त्यांचेच अधिक हित आहे हे वरील विवेचनावरून स्पष्ट होते.

## २.५ विद्यापीठीय प्रश्न

१) आपल्या सदस्य देशांसाठी लष्करी सुरक्षा सुनिश्चित करण्यात नाटोची उद्दिष्टे आणि उपयुक्तता याविषयीची चर्चा करा.

२) नाटोच्या सभासद राष्ट्रांमध्ये लष्करी सुरक्षितता आणण्याच्या भूमिकेचे मूल्यमापन करा

३) शांघाय सहकारी संघटनेची प्रादेशिक सहकार्यातील भूमिकेचे वर्णन करा

4) शांघाय सहकार्य संघटनेचे स्वरूप आणि प्रदेशात सुरक्षा क्षेत्रात सहकार्य वाढीस लागावे यासंदर्भात संघटनेची भूमिका स्पष्ट करा.

## २.६ संदर्भग्रंथ

१) आंतरराष्ट्रीय संबंध : शीतयुद्धोत्तर व जागतिकीकरणाचे राजकारण - प्रा. अरुणा पेंडसे, प्रा. उत्तरा सहस्त्रबुदूधे, ओरिएंट ब्लॅकस्वान, मुंबई

2) आंतरराष्ट्रीय संबंध- डॉ शैलेंद्र देवळाणकर - विद्या बुक्स पब्लिशर्स औरंगाबाद

❉❉❉❉❉❉❉

# ३

# भारत आणि प्रादेशिक संघटना

घटक रचना

३.१ उद्दिष्टे

३.२ प्रस्तावना

३.३ बिम्स्टेक

३.३.१ स्थापना

३.३.२ BIMSTEC ची सहकार्य क्षेत्रे (Areas of Cooperation)

३.३.३ BIMSTEC ची रचना व उद्दिष्ट्ये

३.३.४ भारत आणि BIMSTEC

३.३.५ BIMSTEC समोरील प्रमुख आव्हाने

३.४ इंडियन ओशन रिम असोसिएशन

३.५ सराव प्रश्न

३.६ संदर्भ

## ३.१ उद्दिष्टे

- बिम्स्टेक संघटनेची कार्यपद्धती व भारताचे योगदान अभ्यासणे
- IORA संघटनेची कार्यपद्धती व भारताचे योगदान अभ्यासणे

## ३.२ प्रस्तावना

भारताच्या परराष्ट्र धोरणात शेजारी राष्ट्रांशी मैत्रीपुर्ण आणि सलोख्याच्या संबंधांना विशेष महत्व राहिले आहे. यातूनच आशिया युग (Asian Age), पुर्वेकडे पहा धोरण (Look East Policy), गुजराल धोरण (Gujaral Doctrine), पुर्वेकडे कृती धोरण (Act East Policy) यासारख्या धोरणांचा भारताच्या परराष्ट्र धोरणात जन्म झाला आहे. दक्षिण आशियातील आपल्या शेजारी राष्ट्रांशी असलेले संबंध वृद्धींगत करण्यासाठी भारताने सार्कसारख्या संघटनांच्या निर्मीतीत महत्वाचे योगदान दिले आहे. मात्र, सार्क संघटना दहशतवाद, सदस्य राष्ट्रांतील असहमती, पर्यावरण, समान आर्थिक धोरणाचा अभाव अशा कारणांमुळे मृतप्राय झालेली दिसते. अशावेळी बिम्स्टेकसारख्या संघटनांच्या माध्यमातून भारत प्रादेशिक विकास साधण्याचा प्रयत्न करीत आहे.

हिंद महासागर हा भारताच्या परराष्ट्र धोरणात महत्वपुर्ण भाग असून हिंद महासागराचे भारताच्या भु-राजकारणातील योगदान निर्विवाद आहे. आशिया, आफ्रिका आणि ऑस्ट्रेलिया या खंडातील देशांची एकत्र मोट बांधणारी IORA ही संघटना त्यादृष्टीने महत्वपुर्ण आहे.

प्रस्तुत प्रकरणात आपण भारताचे बिम्स्टेक व IORA संघटनेशी असलेले संबंध व या संघटनांची कार्यपद्धती अभ्यासणार आहोत.

## ३.३ बिम्स्टेक

बिम्स्टेक म्हणजेच Bay of Bengal Initiative for Multi-Sectoral Technical and Economic Cooperaton- BIMSTEC ही बंगालच्या उपसागराशी जोडलेल्या सात सदस्य राष्ट्रांची एक प्रादेशिक संघटना आहे. BIMSTEC मध्ये दक्षिण आशियातील पाच सदस्यांसह (बांगलादेश, भूतान, भारत, नेपाळ आणि श्रीलंका) आणि आग्नेय आशियातील दोन (म्यानमार आणि थायलंड) देशांचा समावेश आहे. त्यामुळे BIMSTEC ही दक्षिण आशिया आणि आग्नेय आशिया यांना जोडणारा एक महत्वपुर्ण दुवा मानली जाते.

### ३.३.१ स्थापना

०६ जून १९९७ रोजी बांगलादेश, भारत, श्रीलंका आणि थायलंड देशाच्या प्रतिनिधींनी बँकॉकमध्ये 'Declaration on the Establishment of the Bangladesh–India–Sri Lanka–Thailand Economic Cooperation (BIST-EC) या करारावर स्वाक्षरी केली. या करारास बँकॉक घोषणा (Bangkok Declaration) असेही म्हणतात. यातून स्थापन झालेल्या गटास BIST-EC असे संबोधले गेले. व्यापार, गुंतवणुक, तांत्रिक देवाणघेवाण व शांतता यासाठी उप-प्रादेशिक सहकार्य निर्माण करणे हे BIST-EC चे प्राथमिक उद्दिष्ट होते.

२२ डिसेंबर १९९७ रोजी म्यानमार सामील झाल्यामुळे BIST-EC चे नाव बदलून BIMST-EC (बांगलादेश, भारत, म्यानमार, श्रीलंका, थायलंड आर्थिक सहकार्य) असे करण्यात आले. यानंतर जुलै २००४ मध्ये थायलंडमध्ये झालेल्या ६ व्या मंत्रीस्तरीय बैठकीत नेपाळ आणि भूतान या देशांनीही संघटनेत प्रवेश केल्याने या गटाचे नाव बदलून BIMSTEC असे करण्यात आले. BIMSTEC चे स्थायी सचिवालय ढाका येथे सप्टेंबर २०१४ पासून कार्यरत आहे.

BIMSTEC ही बंगालच्या उपसागरक्षेत्रामधील १.६७ अब्ज लोकसंख्या आणि एकत्रित GDP सुमारे US $ २.८८ ट्रिलियन द्वारे प्रतिनिधीत्व करणारी प्रमुख संघटना आहे. BIMSTEC ही संघटना भारताच्या शेजारी प्रथम (Neighbourhood First), पुर्वेकडे कृती धोरण (Act East Policy) आणि ईशान्येकडील राज्यांचा विकास साधणे (Development of North-eastern States) या तीन धोरणांची पुर्तता करणारी महत्वपुर्ण संघटना आहे.

### ३.३.२ BIMSTEC ची सहकार्य क्षेत्रे (Areas of Cooperation)

१९९७ मध्ये BIMST-EC संघटनेने परस्पर सहकार्यासाठी व्यापार, तंत्रज्ञान, ऊर्जा, वाहतूक, पर्यटन आणि मत्स्यव्यवसाय या सहा क्षेत्रांवर लक्ष केंद्रित केले. होते २००८ मध्ये BIMSTEC ने कृषी, सार्वजनिक आरोग्य, गरिबी निर्मूलन, दहशतवादविरोध या क्षेत्रांचा त्यात समावेश केला.

२०२१ मध्ये सहकार्य क्षेत्रांची पुनर्रचना करण्यात येऊन त्यात पर्यावरण, संस्कृती, लोकांशी संपर्क आणि हवामान बदल अशा घटकांचा समावेश झाला.

### ३.३.३ BIMSTEC ची रचना व उद्दिष्ट्ये-

BIMSTEC ही संघटना सदस्य राष्ट्राच्या परराष्ट्र मंत्रालयांतर्गत स्थापन राष्ट्रीय फोकल पॉइंट्स (NFP) माध्यमातून काम करते. हे राष्ट्रीय फोकल पॉइंट्स (NFP) BIMSTEC सचिवालय आणि सदस्य राष्ट्रांमधील दुवा साधण्याचे माध्यम मानले जातात.

BIMSTEC ही पाच-स्तरीय संस्था असून सदस्य राष्ट्रांचे प्रमुख किंवा सरकार यांचा समावेश असलेली शिखर परिषद (The Summit) ही सर्वोच्च संस्था मानली जाते. त्याशिवाय सदस्य राष्ट्रांच्या परराष्ट्र मंत्र्यांचा समावेश असलेली मंत्रीस्तरीय बैठक (Ministerial Meeting), BIMSTEC च्या सहकार्य क्षेत्रातील कामकाजाशी निगडीत क्षेत्रीय मंत्रिस्तरीय बैठका (Sectoral Ministerial Meetings), परराष्ट्र सचिवांचा समावेश असलेली वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक (Senior Officials' Meeting) आणि महत्वाचे म्हणजे राष्ट्रीय फोकल पॉइंट्सच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश असलेली BIMSTEC स्थायी कार्य समिती (BPCW) आहे या संस्थांचा समावेश आहे.

BIMSTEC ही संघटना पुढील उद्दिष्टांसाठी काम करतांना दिसते

- जलद आर्थिक विकासासाठी सक्षम वातावरण तयार व्हावे म्हणून आधीच मान्य केलेल्या क्षेत्रांमध्ये आणि सदस्य राष्ट्रांद्वारे सहमत होऊ शकणाऱ्या अशा इतर क्षेत्रांमध्ये विशिष्ट सहकार्य प्रकल्पांची ओळख करणे व अंमलबजावणी करणे.
- समानता आणि भागीदारीच्या भावनेने संयुक्त प्रयत्नांद्वारे बंगालच्या उपसागरातील आर्थिक विकास आणि सामाजिक प्रगतीला गती देणे.
- आर्थिक, सामाजिक, तांत्रिक आणि वैज्ञानिक क्षेत्रात समान हिताच्या बाबींवर सक्रिय सहयोग आणि परस्पर सहाय्याला प्रोत्साहन देणे.
- शैक्षणिक, व्यावसायिक आणि तांत्रिक क्षेत्रात प्रशिक्षण आणि संशोधन सुविधांच्या स्वरूपात एकमेकांना सहाय्य प्रदान करणे.
- सदस्य राष्ट्रांच्या राष्ट्रीय विकास योजनांना सहाय्यक आणि पूरक अशा संयुक्त प्रयत्नांमध्ये अधिक प्रभावीपणे सहकार्य करणे.
- BIMSTEC सदस्य राष्ट्रांमध्ये प्रादेशिक आधारावर सर्वाधिक उत्पादनक्षमता हाताळणाऱ्या प्रकल्पांमध्ये सहकार्य करणे.
- आंतरराष्ट्रीय दहशतवाद, आंतरराष्ट्रीय संघटित गुन्हेगारी तसेच नैसर्गिक आपत्ती, हवामान बदल आणि संसर्गजन्य रोगांचा सामना करण्यासाठी जवळच्या सहकार्याद्वारे बंगालच्या उपसागरात शांतता आणि स्थिरता राखण्यासाठी प्रयत्न करणे.
- समान उद्दिष्टे असलेल्या विद्यमान आंतरराष्ट्रीय आणि प्रादेशिक संस्थांशी जवळचे आणि फायदेशीर सहकार्य राखणे.
- बंगालच्या उपसागरातून गरिबी हटवण्यासाठी प्रयत्न करणे.

- बहुआयामी कनेक्टिव्हिटी प्रस्थापित करण्यासाठी, सामायिक समृद्धीसाठी तसेच आर्थिक एकात्मतेसाठी मुख्य सक्षमकर्ता म्हणून या प्रदेशातील कनेक्टिव्हिटी फ्रेमवर्कमध्ये समन्वयाला चालना देणे.

- या प्रदेशातील आर्थिक आणि सामाजिक विकासाला चालना देण्यासाठी प्रमुख योगदान देणारे घटक म्हणून व्यापार आणि गुंतवणुकीला प्रोत्साहन देणे.

### ३.३.४ भारत आणि BIMSTEC

BIMSTEC चा विचार करता भारत हा आंतरराष्ट्रीय गुन्हे आणि दहशतवादविरोधी कृती, पर्यावरण आणि आपत्ती व्यवस्थापन, वाहतूक आणि दळणवळण, आणि पर्यटन या चार क्षेत्रांत आघाडीवर असलेला देश आहे.

- बंगालच्या उपसागर क्षेत्रातील शांतता आणि स्थिरतेसाठी दहशतवाद हा सर्वात मोठा धोका आहे. भारत BIMSTEC च्या अंतर्गत विविध उप-समूहांच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय गुन्हे आणि दहशतवादविरोधी कृतीसाठी मोलाची भूमिका पार पाडत आहे. याचाच एक भाग म्हणून सरदार वल्लभभाई पटेल राष्ट्रीय पोलीस अकादमी, हैदराबादने BIMSTEC देशांच्या ३६ राष्ट्रीय सुरक्षा अधिकाऱ्यांना सायबर दहशतवाद, काउंटर टेररिझम, सायबर सुरक्षा आणि आंतरराष्ट्रीय गुन्ह्यांवर प्रशिक्षण दिले. याशिवाय, नोव्हेंबर २०१९ मध्ये BIMSTEC देशांसाठी इंडियन फ्यूजन सेंटर - इंडियन ओशन रीजन (IFC-IOR) गुरुग्रामकडून किनारी सुरक्षा कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

- आक्टोबर २०१६ मध्ये भारताने आयोजित केलेल्या गोवा बैठकीत संयुक्त कृती कार्यक्रम (Joint Action Program) स्विकारण्यात आला. या कार्यक्रमानुसार रोजगार आणि समृद्धी या समान उद्दिष्टांना साध्य करण्यासाठी वर्धित कनेक्टिव्हिटी महत्त्वपूर्ण आहे असे मान्य करण्यात आले. याचाच एक भाग म्हणुन BIMSTEC नेत्यांनी मल्टी-मॉडल भौतिक कनेक्टिव्हिटीवर भर दिला आणि मोटार वाहन कराराची शक्यता शोधण्यास सहमती दर्शवली आहे.

- BIMSTEC सदस्य राष्ट्रांत पर्यटन हा महत्वपुर्ण सहकार्य घटक आहे. याचाच एक भाग म्हणुन जुलै २००७ मध्ये दिल्ली येथे BIMSTEC टूरिझम इन्फॉर्मेशन सेंटरची स्थापना करण्यात आली. याशिवाय BIMSTEC सदस्य राष्ट्रांमध्ये पर्यटनाला चालना देण्यासाठी टूर ऑपरेटर्सचे नेटवर्क तयार करण्यासाठी करण्यात आली असून त्यामध्ये बौद्ध पर्यटन सर्किट आणि लक्झरी क्रूझचा समावेश आहे.

### ३.३.५ BIMSTEC समोरील प्रमुख आव्हाने-

सार्कशी तुलना करता द्विपक्षीय तणावापासून मुक्त असूनही BIMSTEC ने फारशी प्रगती केलेली दिसत नाही. BIMSTEC ला दोन दशकांहून अधिक काळ लोटला असूनही या संघटनेने हवी तशी गती प्राप्त केलेली नाही. सध्या BIMSTEC ज्या मुद्द्यांवर चर्चा करत आहे त्यापैकी अनेक मुद्दे हे याआधीच्या बैठकीत वारंवार चर्चिले गेले आहेत. दुर्दैवाने, या

क्षेत्रांमध्ये BIMSTEC ला अजून ठोस यश मिळालेले नाही. २००४ मध्ये अवलंब करण्यात आलेल्या FTA च्या बहुतेक अनिवार्य क्षेत्रांमधील प्रगती असमाधानकारक आहे.

BIMSTEC ला कृतीत आणू शकणारी ऊर्जा कनेक्टिव्हिटी ही प्रादेशिक सहकार्याची एक महत्त्वाची फळी आहे. परंतू, भविष्यातील प्रकल्पांच्या मार्गात प्रादेशिक भूराजकारण येत असल्याचे वारंवार दिसत आहे.

## ३.४ इंडियन ओशन रिम असोसिएशन (IORA)

हिंद महासागराच्या सागरी सीमेवरील आणि शाश्वत तसेच संतुलित विकासासाठी एकत्रितपणे आर्थिक सहकार्य वाढवण्याच्या उद्दिष्टाने एकत्र आलेली इंडियन ओशन रिम असोसिएशन (IORA) ही महत्वपुर्ण संघटना आहे.

मार्च १९९५ मध्ये मॉरिशसमध्ये इंडियन ओशन रिम इनिशिएटिव्ह ही प्रथम संस्था म्हणून स्थापन करण्यात आली त्यामागे दक्षिण आफ्रिकेचे माजी परराष्ट्र मंत्री पिक बोथा तसेच नंतर राष्ट्राध्यक्ष नेल्सन मंडेला यांची प्रेरणा प्रभावी मानली जाते. ६ मार्च १९९७ रोजी Charter of the Indian Ocean Rim Association for Regional Co-operation द्वारे औपचारिकपणे इंडियन ओशन रिम असोसिएशन फॉर रीजनल कोऑपरेशन (IOR-ARC) ही संघटना कार्यरत झाली. नोव्हेंबर २०१३ मध्ये पर्थ, ऑस्ट्रेलिया येथे परराष्ट्र मंत्र्यांच्या १३ व्या बैठकीदरम्यान इंडियन ओशन रिम असोसिएशन फॉर रीजनल कोऑपरेशन (IOR-ARC) या संघटनेचे नाव बदलून ओशन रिम असोसिएशन (IORA) हे नाव स्वीकारण्यात आले

इंडियन ओशन रिम असोसिएशन (IORA) हिंद महासागराच्या सीमेवर असलेल्या किनारी देशांचा समावेश असलेली २३ सदस्य देशांची आंतरराष्ट्रीय संघटना आहे. ही संघटना म्हणजे सदस्य देशांचे प्रतिनिधी, शैक्षणिक आणि व्यावसायिक घटक यांचा त्रिपक्षीय मंच आहे. इंडियन ओशन रिम असोसिएशन एकत्रितपणे सहकार्यासाठी आणि त्यांच्यातील अधिक परस्परसंवादाला प्रोत्साहन देते. ही संघटना खुल्या प्रादेशिकतेच्या मूल्यांवर स्थापन करण्यात आली असून व्यापार सुलभीकरण, गुंतवणूक, प्रदेशाचा सामाजिक विकास आणि प्रोत्साहन या क्षेत्रांवर आर्थिक सहकार्य वाढवण्यासाठी यासारख्या घटकांना महत्व देण्यात आले आहे.

### ३.४.१ इंडियन ओशन रिम असोसिएशन (IORA) ची रचना आणि – उद्दिष्टे

परराष्ट्र मंत्री परिषद (COM) ही इंडियन ओशन रिम असोसिएशन ची सर्वोच्च संस्था आहे. याशिवाय इंडियन ओशन रिम शैक्षणिक गट (IORAG), इंडियन ओशन रिम बिझनेस फोरम (IORBF), व्यापार आणि गुंतवणुकीवर कार्य गट (WGTI) आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांची समिती (CSO) हे घटकही महत्वपुर्ण भूमिका बजावतात.

इंडियन ओशन रिम असोसिएशनची प्रमुख उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत

- सदस्य राष्ट्रांच्या प्रदेशांमध्ये संतुलित विकास आणि शाश्वत वाढीला प्रोत्साहन देणे.

- आर्थिक सहकार्यातून विकासाच्या जास्तीत जास्त संधी उपलब्ध करून देणाऱ्या क्षेत्रांचा विचार करणे.
- सदस्य देशांना वस्तू, सेवा, गुंतवणूक आणि तंत्रज्ञानाचा वर्धित प्रवाह साध्य करण्यात मदत करणे

याशिवाय इंडियन ओशन रिम असोसिएशन (IORA) ने सहा प्राधान्य क्षेत्रे आखली असून त्यामध्ये सागरी सुरक्षा, व्यापार आणि गुंतवणूक सुविधा, मत्स्यव्यवसाय व्यवस्थापन, आपत्ती जोखीम कमी करणे, शैक्षणिक आणि वैज्ञानिक सहकार्य आणि पर्यटन प्रोत्साहन आणि सांस्कृतिक देवाणघेवाण यांचा समावेश होतो.

### ३.४.२ भारत आणि इंडियन ओशन रिम असोसिएशन

२०११ मध्ये इंडियन ओशन रिम असोसिएशनचे अध्यक्षपद भारताकडे असतांना हिंद महासागर क्षेत्रातील भौगोलिक- सामरिक आव्हानांना डोळ्यासमोर ठेवत IORA प्राधान्यक्रमांची पुनर्रचना करण्यात आली. या संदर्भात भारताने मांडलेल्या प्रस्तावाच्या आधारे सहा प्राधान्य क्षेत्रे ओळखण्यात आली.

मार्च २०१५ मध्ये भारतीय पंतप्रधानांनी रोजी मॉरिशसच्या भेटीदरम्यान हिंद महासागर हा शाश्वत आणि समृद्ध भविष्यासाठी महत्त्वाचे साधन असू शकतो असा युक्तिवाद मांडत SAGAR – Security and Growth for All in the Region या धोरणाचा पुनरुच्चार केला.

## ३.५ सराव प्रश्न

- बिम्स्टेक संघटनेची उद्दिष्ट्ये आणि आव्हाने यांची चर्चा करा
- बिम्स्टेक संघटनेतील भारताच्या भुमिकेची चर्चा करा
- इंडियन ओशन रिम असोसिएशनची ऐतिहासिक पार्श्वभुमी व कार्ये स्पष्ट करा

## ३.६ संदर्भ


- Indian Ocean Rim Association and India's Role MEA, New Delhi
- https://bimstec.org/about-bimstec/


❄❄❄❄❄❄❄

# ४

# आंतरखंडिय गट

घटक रचना

४.१. उद्दिष्टे

४.२. प्रस्तावना

४.३ G-७७ (Group of 77)

४.४ G-८ (Group of 8 )

४.५. ब्रिक्स

४.६. विद्यापीठीय प्रश्न

४.७. संदर्भग्रंथ

## ४.१. उद्दिष्टे

१) विश्वात अस्तित्वात असलेल्या G-७७, G-८,ब्रिक्स या आंतरखंडिय गटांविषयी माहिती करून घेणे

२) G-७७ च्या स्थापनेची पार्श्वभूमी रचना, सदस्य राष्ट्रे भूमिकेचा अभ्यास करणे

३) G-८ चा उदय -विकास, रचना, सदस्यराष्ट्रे, कार्यक्रमाचा परिचय करून घेणे

४) ब्रिक्स संघटनेविषयी जाणून घेणे.

## ४.२. प्रस्तावना-

आज विश्वातील राष्ट्रे आपल्या विकास आणि प्रगतीसाठी परस्परांवर अवलंबून आहेत. परस्परांच्या सहकार्यातून ते आपला विकास साधत आहेत. प्रत्येक देशाची काही आर्थिक - राजकीय स्वरुपाची उद्दिष्टे असतात. उदा. व्यापारी सवलती मिळवणे, कर्जाची उभारणी करणे ही उद्दिष्टे सहकार्य आणि संघर्ष, युद्धाच्या मार्गाने साध्य केली जातात.

संघर्षाच्या मार्गाने उद्दिष्टांची अल्पकालीन पूर्तता होत असली तरी त्यातून अनेक गुंतागुंतीचे नवीन प्रश्न निर्माण होतात. उलट सहकार्याच्या माध्यमातून होणाऱ्या उद्दिष्टांची पूर्तता दीर्घकाळ टिकणारी असते. अशावेळी बऱ्याचदा राष्ट्रा-राष्ट्रात द्विपक्षीय किंवा बहुपक्षीय पातळीवर काही करार-मदार होत असतात. हे करार समान उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी केले जातात. यातूनच बहुपक्षीय प्रादेशिक तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर संघटना निर्माण होतात. या संघटनांच्या माध्यमातून राष्ट्रे परस्पर सहकार्य, चर्चा-वाटाघाटी आणि शांततेच्या मार्गाने विकास साधण्यासाठी प्रयत्नशील असतात. चर्चा आणि मित्रत्वाच्या मार्गाने प्रश्न सोडविण्यासाठी राष्ट्रांना समान व्यासपीठ उपलब्ध करून देतात. तसा प्रयत्न करतात.

प्रस्तुत प्रकरणात आपण G-७७, G-८ आणि ब्रिक्स या आंतरखंडिय गट / संघटनांची ओळख करून घेणार आहोत.

## ४.३. G-७७ (Group of 77G-७७ ही संयुक्त राष्ट्रातील (United Nations)

G-७७ (Group of 77G-७७ ही संयुक्त राष्ट्रातील (United Nations) एक स्वैर युती असून, तिची स्थापना ७७ राष्ट्रांच्या एकत्रित जाहीरनाम्यासह १९६४ मध्ये जिनिव्हा (स्वित्झर्लंड) इथे संयुक्त राष्ट्र व्यापार आणि विकास परिषदेत (UNCTAD) झाली. G-77 म्हणजे 'विविधतेतील एकता' याची निर्मिती आहे.

**४.३.१ सदस्य राष्ट्रे (Membership) :-**

या संघटनेचे नाव जरी G-७७ असले तरी सध्या या संघटनेत १३३ सदस्य राष्ट्रांचा समावेश होतो.

मुख्यालय (Head Quarters) : न्यूयॉर्क, अमेरिका

**४.३.२ उदय आणि विकास (Origin & Development):-**

The Group of 77 (G-77) या संघटनेची स्थापना १५ जून, १९६४ रोजी झाली. ७७ विकसनशील राष्ट्रांनी Joint Declaration of The Seventy-seven countries या करारावर सहया केल्या आणि त्यातून या संघटनेचा उदय झाला. हा करार जिनेव्हातील UNCTAD च्या पहिल्या सत्राच्या शेवटी करण्यात आला. २५ ऑक्टो, १९६७ मध्ये अल्जेरियामध्ये पहिली मंत्रालयीन बैठक पार पाडली. त्यामध्ये या संघटनेची सनद जाहीर करण्यात आली. तिला अल्जियर्स सनद दस्तक,१९६७ असे म्हटले जाते. या सनदेत या संघटनेची तत्त्वे, उद्दिष्टे स्पष्ट करण्यात आली आहे. G-७७ या संघटनेने कायमस्वरूपी संस्थात्मक रचना निर्माण केली आहे. G-७७ च्या उदयानंतर अनेक आंतरराष्ट्रीय संघटनांचा उदय झालेला दिसून येतो. जसे रोममध्ये FAO (रोम), UNIDO United Nations Industrial Development Organizations (व्हियन्ना), UNESCO - United Nations Educational, Scientific & Cultural Organizations (पॅरिस) UNEP (नैरोबी) आणि G-२४ (वॉशिंगटन डी.सी.), WB & IMFS. G-७७ संघटनेचे सर्व सदस्य यापैकी कोणत्या ना कोणत्या संघटनेचे सदस्य आहेत.

**४.33 उद्दिष्टे:-**

१) सदस्य राष्ट्रांच्या आर्थिक हिताला उत्तेजन व प्रेरणा देणे.

२) संयुक्त राष्ट्रात सदस्य राष्ट्रांची एकत्रित वाटाघाटी करण्याची क्षमता बळकट करणे.

३) सदस्य राष्ट्रांतील समान समस्यांचे निवारण करण्यास त्यांना एकत्र येण्यास वाव मिळावा म्हणून प्रयत्न करणे

४) विकसनशील देशांना आर्थिक आणि तांत्रिक सहकार्य वाढविण्यासाठी प्रेरणा देणे

### ४.४.४ रचना (Structure):-

G-७७ या संघटनेची विशिष्ट अशी रचना निश्चित केलेली नाही. कारण ती एक आंतरराष्ट्रीय पातळीवरील आंतरराजकीय संघटना आहे. G-७७ च्या अध्यक्षांचे कार्यालय न्यूयॉर्क येथे स्थित आहे. असे असले तरी G-७७ च्या सनदेत संघटनेची कार्यपद्धती, कार्यप्रणाली निश्चित केलेली आहे. G-७७ ची कार्यपद्धती, सदस्यत्व निर्णय प्रक्रिया, विशिष्ट कार्यपद्धती इ. मध्ये एक सारखेपणा म्हणून सामाईक विशिष्ट वैशिष्ट्ये आहे. त्याचे प्रवक्ते म्हणून अध्यक्ष काम पाहतात.

G-७७ चे अध्यक्षपद रोटेशननुसार प्रादेशिकतेच्या आधारावर बदलत राहते. (आफ्रीका, आशिया, लॅटिन अमेरिका, पॅसिफिक क्षेत्र इ. दरम्यान) हा कालावधी एक वर्षासाठी असतो. सध्या बोलीशिव्हाकडे G-७७ चे अध्यक्षपद आहे.

G-७७ च्या वार्षिक बैठकीमध्ये सदस्य राष्ट्रांचे विदेश मंत्री भाग घेतात. या बैठकीत संघटनेच्या कार्यप्रणाली संबंधी महत्वपूर्ण निर्णय घेतले जाते. एप्रिल २००० मध्ये पहिल्यांदा G-७७ च्या राज्यप्रमुखांची बैठक झाली. विशेष मंत्रालयीन बैठकीचे आयोजन आवश्यकतेनुसार केव्हाही केले जाते.

याशिवाय Inter-Governmental Follow up & Co-Ordination Committee (IFCC) ही यंत्रणा विकसनशील देशांदरम्यान आर्थिक सहकार्य वाढावे म्हणून समन्वय साधण्याचे कार्य करते. या यंत्रणेत वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश होतो. ह्या अधिकाऱ्यांची बैठक दोन वर्षातून एकदा होत असते. या बैठकीत १९८१ मधील काराकस कृती कार्यक्रमानुसार (Caracas Program of Action - CPA) संघटनेच्या ध्येयधोरणांची अंमलबजावणी राज्यांकडून होत आहे किंवा नाही याचे परीक्षण केले जाते. त्याचप्रमाणे दक्षिण- दक्षिण सहकार्य, उत्तर-दक्षिण सहकार्य कसे वाढेल? यावर चर्चा केली जाते.

तसेच नाम (NAM- Non Alignment Movement) या संघटनेशी सहकार्य करून न्यूयॉर्क मध्ये Joint Coordinating - Committee (JCC) स्थापन करण्यात आली आहे.

### ४.४.५ कार्यक्रम : व भूमिका

North South NIE Trade

G-७७ ही संघटना विशेष महत्वपूर्ण प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी नेहमीच प्रयत्नशील राहिली आहे. यासाठी G-७७ ने संयुक्त जाहीरनामे, कृतीकार्यक्रम, करार इ. ची निर्मिती केली आहे. आंतरराष्ट्रीय आर्थिक सहकार्य आणि विकासासाठी UNO अंतर्गत कार्य करणाऱ्या विविध संस्थांशी हातमिळवणी केली आहे.

अनेक महत्वपूर्ण आर्थिक प्रश्नांच्या निराकरणासाठी G-७७ ने ध्येयधोरणे आखून त्यांची अंमलबजावणी केली आहे. सदस्यराष्ट्रांनी G-७७ संघटनेच्या माध्यमातून जलदगतीने आपला विकास साधला आहे. त्यांनी स्वतःचे प्रादेशिक व उपप्रादेशिक एकात्मीकरणासाठी विशिष्ट असे उद्दिष्ट, हेतू डोळ्यासमोर ठेवले आहे. शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर सर्व सदस्यराष्ट्रांनी संघटनात्मक हिताला प्राधान्य दिले आहे. सामूहिक हितातूनच आपला

विकास साधला जाऊ शकतो, याची जाणीव या विकसनशील राष्ट्रांना झाली आहे. त्याचप्रमाणे कोणत्याही नफ्याची आशा न बाळगता राष्ट्रा-राष्ट्रांमधील परस्पर आर्थिक सहकार्याला प्रोत्साहन दिले आहे. यामुळे उत्तर - दक्षिण गोलार्धातील आर्थिक विकासाची दरी कमी होण्यास मदत झाली आहे.

२००० मध्ये क्युबातील हवाना येथे भरलेल्या G-७७ च्या परिषदेत तिसऱ्या जगातील राष्ट्रांना जागतिकीकरणामुळे भेडसावणाऱ्या समस्यांवर चर्चा करण्यात आली. याशिवाय, जागतिक अर्थव्यवस्थेतील तेलप्रश्न, उत्तर-दक्षिण वाद, आंतरराष्ट्रीय दहशतवाद, अंमली पदार्थाचा व्यापार यासारख्या मुद्द्यांवरही चर्चा करण्यात आली.

## ४.४ G-8 (Group of Eight)

**४·४·१ प्रस्तावना:-**

G-8 ही संघटना जागतिक अर्थव्यवस्थेत अत्यंत महत्वाचे स्थान असलेली आणि औद्योगिक दृष्ट्या प्रगत राष्ट्रांची संघटना आहे.

**४.४.२ स्थापना:- १९८५ (G-७)**

१९९७ (G-८ )

**४.४३ सदस्य** :- ७-८ मध्ये एकूण ८ सदस्यराष्ट्रांचा समावेश आहे.

ती राष्ट्रे म्हणजे -

1. जर्मनी
2. अमेरिका
3. फ्रान्स
4. जपान
5. इटली
6. इंग्लंड
7. कॅनडा
8. रशिया

**४.४.४ उदय आणि विकास-**

इ. स. १९७५ मध्ये फ्रान्सचे तत्कालीन अध्यक्ष व्हॅलरी गिस्गार्ड देस्तीअॅग यांनी जर्मनी, इंग्लंड, जपान, अमेरिका आणि इटलीच्या प्रमुख नेत्यांना पॅरिस जवळील राम्बुइलेट येथे चर्चेसाठी आमंत्रित केले. या चर्चेत G-८ सारखी संघटना उभारण्याचे ठरविण्यात आले. सुरुवातीला यात सहा राष्ट्रांचा सहभाग होता. मात्र १९७६ मध्ये कॅनडा हा देश संघटनेत सामील झाला. व ही संघटना G-७ म्हणून अस्तित्वात आली. मात्र या संघटनेला मूर्त स्वरूप देण्यासाठी १९८५ साल उजाडावे लागले. १९८५ मध्ये सात देशांनी मिळून G-७ (Group of seven ) संघटना स्थापन केली. पण २१ जून १९९७ रोजी या संघटनेच्या वार्षिक

शिखर परिषदेत रशियाला प्रवेश देण्यात आला व या संघटनेची संख्या ८ झाली. तेव्हापासून हा समूह गट G-८ म्हणून ओळखला जातो.

### ४.४.५ उद्दिष्टे :-

१) जगापुढील आर्थिक आणि राजकीय समस्यांचा विचार करणे आणि त्यावर तोडगा काढणे.

२) देशांदेशांतील अत्याधुनिक तंत्रज्ञान, शिक्षण, औद्योगिक संबंध, पर्यटन, व्यापार इ. क्षेत्रात सहकार्य प्रस्थापित करणे.

### ४.४६ रचना:-

G-८ ही आंतरराष्ट्रीय संघटना नाही. ती कोणत्याही आंतरराष्ट्रीय ठरावावर आधारित नसल्याने तिची विशिष्ट अशी औपचारिक संस्थात्मक रचना निश्चित नाही. तसेच तिचे कायम मुख्यालयही नाही. सदस्य राष्ट्रांचे राष्ट्रप्रमुख व शासन आणि EU राष्ट्रांचे प्रतिनिधी वर्षातून एकदा बैठक घेतात आणि विविध आर्थिक - राजकीय प्रश्नांवर चर्चा करतात.

G-८ सदस्य राष्ट्रांचे निर्णय सदस्य राष्ट्रांच्या राजकीय बांधिलकीवर आधारित असतात. G-८ प्रवेशासाठी कोणतीही औपचारिक कसोटी नाही किंवा सनदही नाही. तरीही G-८ ने सदस्य राष्ट्रांत आळीपाळीने बैठका आयोजित करून एक स्थिर कार्यप्रणाली तयार केली आहे. या बैठकीत विदेश व वित्तमंत्र्यांचा सहभाग असतो आणि याशिवाय पर्यावरण, ऊर्जा श्रमिक व सामाजिक विकास, आरोग्यहित, विज्ञान व शिक्षण, अंतर्गत व न्याय इ. मंत्र्यांचाही सहभाग असतो.

### ४४.७ :- कार्यक्रम व भूमिका-

G-८ च्या सदस्य राष्ट्रांचे एकूण जागतिक उत्पन्नाच्या ६०% उत्पन्न आहे. म्हणुनच, या संघटनेचे जगातील आर्थिक व राजकीय दृष्ट्या स्थान अतिशय महत्वाचे आहे. G-८ संघटना ही अधिकृत व्यासपीठ नाही, मात्र जागतिक अर्थकारण व राजकारणाचे नियंत्रण याच राष्ट्रांकडे आहे. जागतिक व्यापार संघटना, संयुक्त राष्ट्र संघटना, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व जागतिक बँक या सर्व संस्थांची सूत्रेही याच देशांकडे आहे. ही संघटना देशादेशांमधील व्यापार व औदयोगिक संबंधाबरोबरच अण्वस्त्र प्रसारबंदीसाठी प्रयत्न करते. विकसनशील राष्ट्रांना प्रगत तंत्रज्ञान पुरविण्यात व आर्थिक मदत पुरविण्यातही या राष्ट्रांचा मोलाचा वाटा आहे. त्यामुळे या परिषदेत चर्चिला जाणारा प्रत्येक विषय व घेतला जाणारा प्रत्येक निर्णय जगातील इतर सर्व देशांसाठी महत्वाचा ठरु शकतो.

त्याचप्रमाणे G-८ राष्ट्रांकडून गरीब, विकसनशील राष्ट्रांना त्यांच्या आर्थिक विकासासाठी मदत केली जाते. तसेच विविध क्षेत्रातील उन्नतीसाठी कर्ज दिले जाते.

२००७ मध्ये G-८ ची शिखर परिषद हायलिगॅडम या शहरात पार पडली. या परिषदेत महत्वाच्या विषयांवर चर्चा घडून आली. वर्तमानकाळात सर्वात महत्वाचा विषय म्हणजे हवामान बदल आणि Global warming होय. हा विषय परिषदेच्या केंद्रस्थानी होता. जागतिक तापमानवाढीच्या मुद्द्यावरील चर्चेत हरितगृह वायू (Green House Gases) च्या

परिणामाला जबाबदार असलेल्या घातक वायूंचे उत्सर्जन २०५० पर्यंत रोखण्यास G-८ देशांनी मान्यता दिली. ही मान्यता म्हणजे UNO च्या पुढाकाराने झालेल्या क्योटो कराराच्या अंमलबजावणीचे पुढचे पाऊल असल्याचे G-८ च्या अध्यक्षा व जर्मनीच्या माजी चान्सलर श्रीमती अँजेला मर्केल यांनी जाहीर केले. त्याचप्रमाणे जागतिक तापमानवाढ, जागतिक शांतता, रोजगार विकास, दारिद्र्य निर्मूलन, आफ्रिकी तसेच इतर लहान व गरीब देशांचा विकास इ. विषयही G-८ परिषदेत चर्चिले जातात.

G-८ देशांनी एड्स, हिवताप व अन्य रोगांच्या मुकाबल्यासाठी आणि विकासकामांसाठी आफ्रिकी देशांना ६० कोटी डॉलर्सचा निधी देण्याचा निर्णय संघटनेने घेतला आहे. आफ्रिकी देशांतील प्रशासन, व्यापार, उद्योग क्षेत्रात सुधारणेची गरज असून, त्यादृष्टीने आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे ठरविले आहे.

२००७ च्या G-८ परिषदेच्या समाप्तीनंतर G-८ संघटनेतर्फे एक निवेदन प्रसिद्ध करण्यात आले. त्यानुसार भारताबरोबर नागरी वापरासाठी अणुकरार करण्यास G-८ देशांनी अनुकूलता दर्शविली होती. पण त्यासोबतच भारताने अण्वस्त्रप्रसारबंदी करारावर सही करावी व ज्यामुळे अणुतंत्रज्ञानाच्या सुरक्षिततेची स्थिती अधिक भक्कम बनेल.

सन २००८ मध्ये चीन, भारत, दक्षिण कोरिया, युरोपियन समुदाय यांनी मिळून G-८ देशांबरोबर ऊर्जा कार्यक्षमता सहकार्यासठी आंतरराष्ट्रीय भागीदारी केली आहे. यामध्ये जपानचे ऊर्जामंत्रालय मध्यस्थी होते.

G-८ च्या सदस्य राष्ट्रांच्या वित्तमंत्र्यांनी G-८ कृती आराखडा (G-8 Action Plan) संमत केला आहे. ज्याचा प्रमुख उद्देश म्हणजे खाजगी आणि सार्वजनिक आर्थिक संस्थांना हवामानबदलाविरुद्ध लढाई देण्यासाठी प्रवृत्त करणे व त्यासंबंधी निधी पुरवणे. त्यासाठी विश्व बँकेचा New Climate Investment Funds (CIFS) निर्माण केला आहे. आणि त्याला G-८ मंत्र्यांनी पाठिंबा दिला आहे. हवामान बदलासंदर्भात UNFCCC च्या मार्गदर्शनाखाली एक आराखडा आखण्यात आला आहे. (UNFCCC- United Nations Framework Convention on climate Change)

मागील काही वर्षापासून भारत, चीन, ब्राझील, मेक्सिको आणि दक्षिण आफ्रिका या देशांना G-८ च्या शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी आमंत्रित करण्यात येत आहे. त्यामुळे लवकरच G-८ ही संघटना G-१३ म्हणून अस्तित्वात येईल, अशी शक्यता निर्माण झाली होती. पण या सर्व पाच देशांनी स्वतःचाच एक वेगळा गट निर्माण करण्याचे ठरविले आहे. जेणेकरून श्रीमंत देशांवर योग्य व प्रभावीपणे दबाव टाकता येईल. परंतु भारत आणि चीन च्या नेतृत्वाखाली या देशांनी सन २००७ मध्ये G-५ या संघटनेची स्थापना केली. लोकसंख्याच नव्हे तर आर्थिक विकासाबाबतही हा नवा गट प्रभावी ठरण्याची शक्यता आहे

G-५ देशांनी शिखर परिषदा सुरु असताना, नव्या जागतिक परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर जगाला भेडसावणाऱ्या नव्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी एकत्र येत असल्याचे जाहीर केले. नव्या संघटनेने श्रीमंत देशांची भेट घेऊन जगासमोरील नव्या प्रश्नांची चर्चा केली व त्यावरील आपली भूमिका स्पष्ट केली. हे प्रश्न सामुदायिक नेतृत्वातून सोडविले जावे असा आग्रह त्यांनी G-८ देशांपाशी केला.

थोडक्यात, G-८ ही औद्योगिककरण झालेल्या ८ अग्रेसर लोकशाहीवादी राष्ट्रांच्या प्रमुखांचा अनौपचारिक गट आहे. तीव्र स्वरुपाच्या आंतरराष्ट्रीय समस्यांप्रती असलेल्या दृष्टीकोनांमध्ये संबंध जुळवण्यासाठी या न्यायसभेची रचना करण्यात आली. G-८ राष्ट्रे आज जगातील वित्तव्यवस्थेचे ६५%, जागतिक निर्यातीचे ४९%, औदयोगिक उत्पादनाचे ५१% आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधीतील मालमत्तेच्या ४९% चे प्रतिनिधीत्व करतात. G-८ मध्ये समाविष्ट असलेल्या राष्ट्रांची लोकसंख्या जागतिक लोकसंख्येपैकी जरी १४% च असली तरी जगाच्या GDP तील त्यांचा हिस्सा २/३ आहे. म्हणून G-८ ची भूमिका विश्व राजकारणात महत्वपूर्ण आहे.

## ४.५ BRICS - Brazil, Russia, India, China & South Africa.

**प्रस्तावना:-**

दुसऱ्या महायुद्धानंतर आर्थिक आणि व्यापारी हितसंबंध डोळ्यासमोर ठेवून देशादेशांमध्ये अनेक संघटना जन्माला आल्या. नाटो , सिएटो , सार्क आदिच्या मालिकेतील ताजी संघटना म्हणजे BRICS होय. यातील नाटो संघटना वगळता अन्य सर्वच संघटनांचा उद्देश अमेरिकेच्या वाढत्या व्यापारी ताकदीला रोखणे हा होता.

BRICS हा विकासाच्या मार्गावर असलेल्या उदयोन्मुख अर्थव्यवस्थांचा किंवा देशांचा एक समूह आहे ही राष्ट्रे म्हणजेच Brazil, Russia, India, China & South Africa ही होय. अमेरिकन बँक गोल्डमन सॅक्स च्या जिम - ओ नील या अर्थवेत्त्याने सन २००१ मध्ये आर्थिक वाढीकडे झेपावू शकणाऱ्या चार देशांच्या नावांची आद्याक्षरे एकत्र करून BRIC- Brazil, Russia India & China हा शब्द बनवला. सन २०१० पर्यंत या संघटनेचे नाव BRIC असे होते. सन २०१० पर्यंत या संघटनेत रशिया सामील झाले आणि या गराचे नाव BRICS असे करण्यात आले.

BRICS सदस्यराष्ट्रे ही विकसनशील किंवा नव्याने उद्योगप्रधान असणारे देश आहेत. त्यांचा जलदगतीने विकास होत असून, जागतिक अर्थकारणात ही राष्ट्रे महत्वाची भूमिका बजावित आहेत. म्हणुनच BRICS राष्ट्रांना आंतरराष्ट्रीय राजकारणात अत्यंत महत्व प्राप्त झाले आहे.

**४.५.१ पार्श्वभूमी:-** (Background) अमेरिकन बँक गोल्डमन सॅक्सने Brazil, Russia, China & India या चार अर्थव्यवस्थांचा स्वतंत्र अभ्यास तसेच संशोधन करून आपले प्रमेय मांडले आणि वेळोवेळी त्याची समीक्षा करून त्यात सुधारणा केली. हे प्रमेय चार ही देशांनी उचलून धरले. गोल्डमन सॅक्सने या चारही राष्ट्रांनी काय करावे? हे कधीच सांगितले नाही किंवा सुचवले नाही. परिणामी जसजशी प्रमेयाची पकड घट्ट होत गेली तसतशी चारही राष्ट्रे परस्परांजवळ येत गेली.

जिम ओ नील आणि त्याच्या सारख्या अर्थ- शास्त्रज्ञांना असे वाटत होते की, सन २००१ नंतरच्या सात-आठ वर्षांत BRICS राष्ट्रांचे महत्व विश्व राजकारणात वाढणार आहे.

सप्टेंबर, २००६ मध्ये न्यूयॉर्क शहरात BRIC च्या चार सदस्य राष्ट्रांचे परराष्ट्रमंत्री एकत्र आले. आणि त्यांनी या चारही देशातील महत्वपूर्ण प्रश्नांवर चर्चा केली. त्यानंतर आलेल्या जागतिक - मंदीच्या पार्श्वभूमीवर BRIC ला अधिक जवळ येण्याची निकड वाटली आणि

म्हणूनच २००८ मध्ये या चारही देशांच्या राष्ट्रप्रमुखांची पहिली शिखर परिषद रशियातील एडातरीनबर्ग येथे संपन्न झाली. त्यानंतर BRICचा उदय झाला.

एप्रिल, २०१० मध्ये ब्राझीलमधील ब्राझीलिया येथे झालेल्या दुसऱ्या परिषदेत दक्षिण आफ्रिका हे राष्ट्र BRIC मध्ये पाचवे सदस्य म्हणून सामील झाले तेव्हापासून BRIC हा गट BRICS या नावाने ओळखला जाऊ लागला.

विशेष म्हणजे BRICS ची पाचही राष्ट्रे G-20 या प्रगत व प्रगती पथावर असणाऱ्या राष्ट्रांच्या अनौपचारिक राष्ट्रसमूहाचे सदस्य आहे.

### ४.५.२ सदस्य राष्ट्रे : (Membership)

BRICS समूहात ब्राझील, रशिया, भारत, चीन आणि द. आफ्रिका या पाच सदस्यांचा समावेश होतो.

याशिवाय इंडोनेशिया आणि तुर्की हेही BRICS ची संभाव्य सदस्य (Potential members) मानले जातात. याशिवाय इराण, इजिप्त, नायझेरिया, सिरीया ही राष्ट्रे BRICS मध्ये सामील होण्यास उत्सुक आहेत.

### ४.५.३ उद्दिष्टे (objectives):- BRICS ची उद्दिष्टे खालीलप्रमाणे-

१) BRICS व्यासपीठावरून ऊर्जा आणि अन्नसुरक्षेस उत्तेजन देणे, दहशतवाद विरोध आणि जागतिक राजकीय आर्थिक यंत्रणेत सुधारणा करणे.

२) कायदयाचे अधिराज्य व बहुपक्षीय राजनयाच्या आधारावर आंतरराष्ट्रीय लोकशाही व्यवस्थेची बांधणी करणे.

३) जागतिक अर्थव्यवस्थेत राष्ट्रांच्या चिरंतन विकासासाठी प्रयत्न करणे व त्यासाठी राष्ट्रांना उत्तेजन देणे.

४) विश्वातील राष्ट्रांच्या सामायिक समस्यांचे जसे दारिद्र्य, भूकबळी, आजार इ. प्रश्नांविषयी चर्चा करून त्यांचे निर्मूलन करण्यासाठी उपाययोजना करणे.

५) सदस्य राष्ट्रांच्या समान हितसंबंधांची बांधणी

६) लोकशाही, न्याय्य व स्थैर्यशील जगाची उभारणी करणे

७) सदस्यराराष्ट्रांचा आर्थिक विकास साधणे.

### ४.५.४ रचना (Structure) :-

BRICS राष्ट्रसमूहाची विशिष्ट व निश्चित अशी रचना नाही. शिखर परिषदेतून राष्ट्रप्रमुख एकत्र येतात. या शिखरपरिषदेत सदस्य राष्ट्रातील विविध सामायिक प्रश्नांवर चर्चा केली जाते व त्यासंबंधी कोणत्या उपाययोजना करता येईल, हे ठरविले जाते. तसेच सहक प्रश्न व वाटचाली संबंधी परराष्ट्र मंत्री स्तरावर निर्णय घेतला जातो. त्याचप्रमाणे संरक्षण, अर्थ, कृषी, आरोग्य, व्यापार आणि शिक्षण इ. क्षेत्रातील सुधारणांसंबंधी BRICS राष्ट्रसमूह, प्रयत्नशील आहेत. या सारख्या महत्वाच्या क्षेत्रांमध्ये परस्पर सहकार्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांमध्ये चर्चा होत राहते.

### ४.५.५ BRICS Summit.

१) २००९ - एडातरिनबर्ग (रशिया)

२) २०१० - ब्राझीलिया

३) २०११ - सन्या (चीन)

४) २०१२ - नवी दिल्ली

५) २०१३ - डर्बन

६) २०१४ - Fortaleza

७) २०१५ - UFA

८) २०१६ - Benaulim

९) २०१७ - Xiamen

१०) २०१८ - जोहान्सबर्ग

११) २०१९ - ब्रासिलिया

१२) २०२० - (व्हिडीओ कॉन्फरन्स) - सेंट पीटर्सबर्ग

१३) २०२१ - (व्हिडिओ कॉन्फरन्स) - नवी दिल्ली

१४) २०२२ - (व्हिडिओ कॉन्फरन्स) - बीजींग

१५) ऑगस्ट २०२३ - डर्बन येथे प्रस्तावित

### ४.५.६ BRICS गटाचे महत्व (Importance)

१) BRICS मधील पाचही देश विकसनशील असून, त्यांच्या विकास व त्या अनुषंगाने असणाऱ्या वित्तीय क्षमता आणि गरजा समान आहेत.

२) आज जागतिक अर्थव्यवस्थेतील तीन महत्वाचे घटक म्हणजे अमेरिका- जपान- EU होय. या घटकांवर आर्थिक अरिष्ट ओढवले आहे. मात्र या पाचही राष्ट्रांच्या अर्थव्यवस्था वेगाने वाढत आहेत. त्यांच्या वाढीचा वेग मंदावला असला तरी तो इतर देशांच्या तुलनेत जास्तच आहे.

३) जागतिक वित्तीय परिस्थिती सुधारण्यासाठी BRICS राष्ट्रांच्या भूमिकेकडे जगाचे लक्ष असते. चीन वगळता इतर राष्ट्रांच्या वैयक्तिक भूमिकेला कदाचित महत्व नसेल पण BRICS ची भूमिका महत्वाची असते.

४) ही राष्ट्रे भावी महासत्ता होऊ शकण्याच्या क्षमतेची आहेत त्यांचे सामरिक व भूराजकीय स्थान त्यांच्या या आकांशांना साजेसे आहेत.

### ४.५.७ BRICS ची भूमिका / मूल्यमापन: (Role / Evaluation).

समकालीन आंतरराष्ट्रीय राजकारणात BRICS समूहाचे महत्व अनन्यसाधारण आहे. जागतिक शांतता व आंतरराष्ट्रीय सहजीवन, सुरक्षा, सुव्यवस्था, पायाभूत सुविधांचा विकास, सदस्य राष्ट्रांचा चिरंतन विकास, आरोग्य, शिक्षण, व्यापार, तंत्रज्ञान इ. अनेक क्षेत्रात BRICS ने महत्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

मार्च २०१२ मध्ये भारताची राजधानी नवी दिल्ली येथे BRICS राष्ट्रप्रमुखांची शिखर परिषद झाली. त्यामध्ये या देशातील विकास, विविध समस्या, त्यांच्या निर्मूलनार्थ उपाय यावर चर्चा करण्यात आली. तसेच त्यादृष्टीने विविध कृतिकार्यक्रम आखण्यात आले. यामध्ये Delhi Action Plan अत्यंत महत्वाचे स्थान आहे.

२०१३ मध्ये आफ्रिकेतील डर्बन येथे BRICS ची ५ वी बैठक पार पडली. या बैठकीस सर्व देशांचे राष्ट्रप्रमुख हजर होते. या परिषदेच्या जाहीरनाम्यात आफ्रिकेच्या मूलभूत विकासासाठी प्रयत्न, BRICS बँकेची निर्मिती, IMF मधील बदल, UNO तील संस्थात बदल, जागतिक स्थैर्य, सुरक्षा व समृद्धी याशिवाय सिरियातील ढासळणारी परिस्थिती, पॅलेस्टाईनचे संयुक्त राष्ट्र संघटनेतील सदस्यत्व, इराणचे आण्विक धोरण, अफगाणिस्तानचा प्रश्न. अशा विविध गोष्टींवर भर देण्यात आला

२०११ मध्ये चीनमधील सन्या शहरात झालेल्या परिषदेनंतर BRICS चे वाढते महत्त्व दिसून आले आहे. बहुसांस्कृतिक जगातील एक महत्वाचा गट म्हणून BRICS ची ओळख यापुढेही वाढत जाणार आहे. जगातील बदलत्या आर्थिक स्थितीमुळे BRICS चे महत्व वाढत आहे. अमेरिकेतील वित्तीय संकट व युरोपातील मोठ्या बँकांची दिवाळखोरी यामुळे BRICS राष्ट्रांकडेच आर्थिक आशेचे किरण म्हणून पाहिले जात आहे. चीन व भारताप्रमाणे ब्राझील व रशियाची सुद्धा आर्थिक घडी या जागतिक मंदीच्या काळात विस्कटलेली नाही. त्यांचा आर्थिक दर अन्य देशांच्या तुलनेत मोठा आहे येत्या दोन दशकात हे चार देश G-८ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आठ बडया नि प्रगत देशांच्या समूहाला ही मागे टाकणार असे आखाडे आहे

त्याचप्रमाणे जागतिक स्थैर्य, सुरक्षा आणि सहभाग- समृद्धी यासाठी BRICS चा सहभाग महत्वपूर्ण आहे. BRICS मधील विज्ञान-तंत्रज्ञान सहकार्य, व्यापारी स्पर्धेचे नियमन, राष्ट्रीय विकास बँका, नगररचना आदि क्षेत्रांतील सहकार्यामुळे आणि त्यासाठी विविध आयोग, व्यापारी व उदयोजकीय संस्था आदिचा संवाद वाढल्याचे दिसत आहे. आर्थिक विकासाच्या समान टप्प्यावर असलेले हे देश एकमेकांच्या चुका पाहून त्या कशा टाळाव्यात हेही शिकू लागले आहे. सुरक्षा परिषदेच्या प्रत्येक अधिवेशनापुर्वी BRICS देशातील विदेशमंत्री सचिव या प्रतिनिधीची बैठक होत असते.

असे असले तरी BRICS समोर अनंत अडचणी व धोक्याची वळणे आहेत. भारत- चीन यांच्यामध्ये भूराजकीय सीमावाद आहे. त्यावरून त्यांच्यात एक युद्धही झाले आहे रशिया- चीन मैत्री असली तरी त्यांच्यात एक सुप्त संघर्ष आहे. चीनची एकट्याची अर्थव्यवस्था इतर सर्व देशांच्या अर्थव्यवस्थेच्या बेरजेएवढी आहे. द. आफ्रिका इतर राष्ट्रांच्या मानाने लहान

आहे. बऱ्याचदा चीनविषयी सर्व राष्ट्रांना एक संशय वाटत असतो. परंतु चीनकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही, याची जाणीव राष्ट्रांना आहे.

BRICS देश नवीन बँक स्थापन करु इच्छित आहे. याबद्दल बऱ्याच शंका घेतल्या जात आहेत. मात्र सदस्यराष्ट्रांतील एकवाक्यतेअभावी त्याविषयी काही ठोस निर्णय घेता आले नाही. (२०१३ मध्ये) मात्र असे निर्णय घेण्याइतका आत्मविश्वास या राष्ट्रांमध्ये आहे.

BRICS चे निर्णय प्रभावशाली होण्यासाठी अजून प्रयत्नांची गरज आहे. व ते प्रयत्न येत्या काळात होतील- आज कदाचित BRICS चे महत्व कमी असेल. मात्र आगामी काळात ते वाढणार आहे, हे निश्चित.

## ४.६. विद्यापीठीय प्रश्न-

१) तिसऱ्या जगाच्या ऐक्यासाठी G -७७ ने केलेल्या प्रयत्नांची चर्चा करा

२) G- ७७, या गटाच्या तिसऱ्या जगातील ऐक्य वाढविण्याच्या भूमिकेचे टीकात्मक मूल्यमापन करा

३) G. ८ ची उदिष्टे, रचना रचष्ट करा

४) आपल्या सदस्य राष्ट्रांत आर्थिक एकीकरण वाढावे यासंदर्भात ब्रिक्सच्या उदिष्टांचे टीकात्मक परीक्षण करा.

## ४.७. संदर्भग्रंथ

1) International Organizations, Conferences & Treaties, Spectrum Publications

❄❄❄❄❄❄❄